मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

| मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक - श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 ■ अंक : ८१ ■ शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## थोडक्यात

### एसटीच्या नव्या बसगाड्यांवर चालकांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने; कंत्राटी भरती प्रक्रियेचा राज्य सरकारने फेरविचार करण्याची मागणी



**मुंबई :** राज्य सरकार एसटीला स्वमालकीच्या ८ हजार नवीन गाड्या खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणार असून याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. हा निर्णय प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत चांगला व दिलासा देणारा असला तरी त्याला लागणारे चालक मात्र कायमस्वरूपी देण्यास सरकारने असमर्थता दर्शविली असून या गाड्यांवर कंत्राटी पद्धतीने चालक नेमले जाणार आहेत. याचा दूरगामी परिणाम एसटीच्या भवितव्यावर होणार असल्याने कंत्राटी पद्धतीने करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेबाबत फेरविचार करावा, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केली आहे. एसटीच्या ताफ्यात येत्या सहा महिन्यात नवीन ८००० गाड्या येणार आहेत. प्रवाशांच्या दृष्टीचे हा अत्यंत चांगला व महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे. बऱ्याच वर्षांनी एसटीच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर गाड्या येत असल्याने अनधिकृत खासगी वाहतुकीला मोठ्या प्रमाणात आळा बसेल अशी शक्यता सुद्धा वर्तवली जात आहे. मात्र या गाड्यांवर कंत्राटी पद्धतीने चालक नेमले जाणार आहेत. हे कंत्राट तीन वर्षांसाठी असून गाड्यांचे आयुर्मान मात्र १५ वर्ष असणार आहे. याशिवाय निर्धारित १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व किलोमीटर संपल्यावर या गाड्या एलएनजीमध्ये रूपांतरित होणार आहेत.एसटी चालविण्यासाठी तीन वर्षांनी चालक मिळणे मुश्कील होऊ शकते.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती नाही

## ठरलेल्या वेळेतच निवडणुका होणार; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्याच्या मुद्द्यावर आज पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. राज्य निवडणूक आयोगाने ४० नगरपरिषद आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देण्यात आल्याची कबुली दिल्यानंतर हा वाद अधिकच गंभीर बनला होता. मात्र, आजच्या सुनावणीत भारताचे मुख्य न्यायाधीश (CJI) सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने स्पष्ट आदेश दिला की, या प्रक्रियेत कोणत्याही निवडणुकीला स्थगिती देण्यात येणार नाही.

त्यामुळे २८८ नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणेच होतील; मात्र आरक्षणाचा वाद असलेल्या सर्व निवडणुकांचा अंतिम निकाल कोर्टाच्या अंतिम निर्णयाच्या आदेशाधीन राहील.

**बांठिया आयोगाचा अहवाल**

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की मनपा, जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांमध्ये अनावश्यक विलंब होऊ नये. त्यांनी मांडले की ५० टक्क्यांच्या आरक्षण मर्यादेवरील सर्वोच्च न्यायालयाचा पूर्वीचाच निर्णय अद्याप लागू आहे आणि कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था ही मर्यादा ओलांडू शकत नाही. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने आजच्या स्थितीत तात्पुरता उपाय म्हणून बांठिया आयोगाचा अहवाल 'बेंचमार्क' मानण्याचा निर्णय घेतला.

### पुढील सुनावणी

**या खंडपीठासमोर पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होणार आहे. या सुनावणीमध्ये आरक्षणाच्या मर्यादा, बांठिया आयोगाची वैधता, ओबीसी आरक्षणाच्या गणितासह सर्व मुद्द्यांवर निर्णायक चर्चा अपेक्षित आहे.**

## कुंभमेळा प्राधिकरण आयुक्तांकडून गोदावरी तीरावरील घाटांची पाहणी



**दैनिक युवक आधार**
**नाशिक, प्रतिनिधी :**

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त तथा सदस्य सचिव शेखर सिंह यांच्यासह महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी आज सकाळी गोदावरी नदीच्या काठावरील घाटांची पाहणी करून विविध सूचना केल्या.आयुक्त श्री. सिंह यांनी रामकुंड परिसर, गांधी तलाव, पांडे मिठाई पूल, बालाजी कोठ, गणेशवाडी पूल, रामसेतू पूल, गाडगे महाराज पुलासह अमरधामपर्यंतच्या घाटाची पाहणी केली. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे, महानगरपालिकेचे शहर अभियंता संजय अग्रवाल आदी उपस्थित होते.

## महात्मा फुले वाड्याच्या पालकत्वासाठी समता परिषदचं शासनाला पत्र, फुले प्रेमींचा विरोध

**दैनिक युवक आधार**
**पुणे, प्रतिनिधी :**

पुण्यातील गंजपेठ येथे असलेलं महात्मा फुले वाडा स्मारक हे 'महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेअंतर्गत स्मारकांचे पालकत्व हे समता परिषदला देण्यात यावं असं पत्र सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांना समता परिषदेच्या माध्यमातून देण्यात आलं आहे. याला आता फुले प्रेमींकडून विरोध करण्यात येत आहे.

महात्मा फुले प्रेमी आणि समता प्रतिष्ठानकडून आज महात्मा फुले यांच्या १३५ व्या पुण्यतिथी निमित्ताने फुले वाड्यात पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि महापालिका आयुक्तांना निवेदन देत याला विरोध करण्यात आला आहे. यावेळी समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन पवार म्हणाले की, पुणे शहरातील ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या महात्मा फुले वाडा या वास्तूला समता प्रतिष्ठान या संघटनेला व्यवस्थापनासाठी दत्तक दिले जाणार असल्याची चर्चा आहे.

याबाबतची शासकीय स्तरावर बैठकांची मोहीम सुरू असल्याचं देखील दिसून आलं आहे. परंतु या प्रस्तावाला तसंच छगन भुजबळ यांच्या संस्थेला ही वास्तू व्यवस्थापनासाठी देण्यास आमचा विरोध आहे. चार तारखेपर्यंत याबाबतची भूमिका शासनाने स्पष्ट करावी अन्यथा आम्ही तीव्र आंदोलन करू असा इशारा यावेळी त्यांनी दिला.




पवार पुढे म्हणाले की, समता परिषदेची जी मागणी आहे ती फुलेंच्या विचारांना नख लावणारी आहे. महात्मा फुले हे कोणत्याही एका जातीचे नव्हते. महात्मा फुले वाडा हा सर्वांसाठी ऊर्जास्थान आहे.

महात्मा फुले वाड्याची शासनाकडून चांगल्या पद्धतीने देखरेख होत आहे. समता परिषदेने जो काही प्रस्ताव दिला आहे, त्याला आमचा विरोध असून आम्ही फुले वाड्याचं खासगीकरण होऊ देणार नाही.

आम्ही यापुढे याबाबत तीव्र आंदोलन उभं करू, असं देखील यावेळी नितीन पवार म्हणाले.

## रेल्वे स्थानकांबाहेर फेरीवाल्यांचा धोका रोगासारखा फैलावतोय; हायकोर्टाने व्यक्त केली चिंता

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

कांदिवली रेल्वे स्थानकाबाहेर बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना उच्च न्यायालयाने चांगलाच दणका दिला आहे. अनेक वर्षांपासून एकाच जागेवर धंदा करीत असल्याचे सांगून फेरीवाल्यांनी जागेवर दावा केला होता. परंतु, त्यांचा दावा दिवाणी न्यायालयाने फेटाळून लावला. त्या विरोधात दाखल केलेले अपील न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने फेटाळताना उपनगरी रेल्वे स्थानकांबाहेर फेरीवाल्यांचा धोका एखाद्या रोगासारखा फैलावत आहे, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आणि अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांना दंड ठोठावला.



## अश्लील कंटेंटची जबाबदारी कोणाला तरी घ्यावी लागेल; ४ आठवड्यांत नियम तयार करण्याचे सुप्रीम कोर्टाचे केंद्राला आदेश

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

सोशल मीडियावर टाकल्या जाणाऱ्या अश्लील कंटेंटची जबाबदारी कोणाला तरी घ्यावी लागेल, अश्लील कंटेंट थांबवण्यापूर्वीच लाखो लोक पाहतात त्यामुळे केंद्र सरकारने याबाबत ४ आठवड्यांत नियम बनवावे, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला.

सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी सोशल मीडियावरील मजकुरावर सुनावणी झाली. सोशल मीडियावर टाकल्या जाणाऱ्या प्रौढ कंटेंटसाठी कोणाला तरी जबाबदार धरावेच लागेल, असे न्यायालयाने म्हटले. सर्वोच्च न्यायालयाने 'इंडियाज गॉट लेटेंट'शी संबंधित प्रकरणात ही टिप्पणी केली. या शोमधील आक्षेपार्ह कंटेंटवर वाद झाल्यानंतर रणवीर अलाहबादिया आणि समय रैना यांसारख्या अनेक यूट्यूबर्सना चर्चेत आणले होते. न्यायालयाने म्हटले की, अश्लील कंटेंट थांबवला जाईपर्यंत लाखो लोक तो पाहून घेतात, त्यामुळे केंद्र सरकारने यासंदर्भात ४ आठवड्यांत नियम बनवावे.




## रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन पुढच्या महिन्यात दोन दिवसीय भारत दौऱ्यावर

### ■ राष्ट्रपती मूर्मू आणि पंतप्रधान मोदी यांना भेटणार

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी :**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत भेटीबाबत एक मोठी अपडेट आली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ४ आणि ५ डिसेंबर रोजी दोन दिवसीय भारत दौऱ्यावर येणार आहेत. रशिया हा भारताच्या सर्वात विश्वासू मित्रांपैकी एक आहे. पुतिन यांच्या या भेटीमुळे रशिया आणि भारत यांच्यातील संबंध आणखी मजबूत होतील असं मानले जातं आहे. या भेटीत तेल खरेदी, संरक्षण आणि व्यापार यासह महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे.या वर्षी ऑगस्टमध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्या मॉस्को दौऱ्यादरम्यान पुतिन यांच्या भारत भेटीची घोषणा करण्यात आली होती. तथापि, त्यावेळी तारखा निश्चित करण्यात आल्या नव्हत्या. नंतर पंतप्रधान मोदी आणि पुतिन यांची चीनमध्ये शांघाय सहकार्य संघटनेच्या (SCO) शिखर परिषदेदरम्यान भेट झाली.

**पुतिन यांचा भारत दौरा खूप महत्त्वाचा :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प बऱ्याच काळापासून भारतावर रशियाकडून तेल खरेदी थांबवण्यासाठी दबाव आणत आहेत. पण असे असूनही, भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे.



या पार्श्वभूमीवर पुतिन यांचा भारत दौरा खूप महत्त्वाचा मानला जात आहे.

**पंतप्रधान आणि राष्ट्रपतींना भेटणार :** पुतिन पंतप्रधान मोदींना भेटतील. या भेटीदरम्यान रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील. पुतिन यांचा भारत दौरा अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरेल. रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी अमेरिकेनं भारतावर टॅरिफ लादला होता.

**भारत-रशिया धोरणात्मक संबंध बळकट होणार :** पुतिन यांच्या भेटीमुळे संरक्षण, ऊर्जा, हवामान बदल, अक्षय ऊर्जा, आपत्ती व्यवस्थापन आणि शिक्षण यांसारख्या क्षेत्रातील अनेक नवीन करार होऊ शकतात. काही जुन्या करारांचे नूतनीकरण देखील शक्य आहे.

## बोगस जन्म-मृत्यू दाखले रद्द करा; महसूल मंत्र्यांचे आदेश, दाखल्यांच्या नोंदणीबाबत मार्गदर्शक सूचना जारी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्यात बेकायदेशीर पद्धतीने व खोट्या कागदपत्रांच्या आधारे मिळविलेल्या जन्म-मृत्यू दाखल्यांचे रॅकेट मोडून काढण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कंबर कसली असून, केवळ आधारकार्डच्या पुराव्यावर दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करून, पोलिसांत तातडीने तक्रार दाखल करण्याचे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

याबाबतचे परिपत्रक गुरुवारी महसूल विभागाने जारी केले असून तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना १६ मुद्द्यांच्या आधारे जन्म-मृत्यू दाखल्याची तपासणी करावी, असे सुचविण्यात आले आहे.

अतिरिक्त मुख्य सचिव गृह व अतिरिक्त मुख्य सचिव महसूल यांच्या उच्चस्तरीय बैठकीतील सूचनांनंतर महसूल मंत्री बावनकुळे यांनी आदेश दिले.



"मुळात जन्म-मृत्यूचे दाखले देण्यासाठी आरोग्य विभागाची यंत्रणा आहे. मात्र एक वर्षे उलटून गेल्यावर हे दाखले महसूल विभागामार्फत दिले जातात. त्यासाठी तहसीलदार व त्यावरील अधिकारी सक्षम आहेत. मात्र, अनेक ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे बरेच गैरप्रकार झाल्याचे आढळून आले. त्यामुळे आता प्रमाणपत्र परत घेणे किंवा त्यांची फेरतपासणी करण्याचे निश्चित केले आहे," असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

**खोट्या नोंदी आढळल्यास थेट गुन्हा दाखल**

अर्जातील माहिती आणि आधारकार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळल्यास संबंधित व्यक्तीवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसेच, जे लाभार्थी मूळ प्रमाणपत्र परत करणार नाहीत किंवा जे आता सापडत नाहीत, त्यांची यादी बनवून त्यांना 'फरार' घोषित करणार असून त्यांच्यावर स्थानिक पोलिसांत एफआयआर दाखल करण्यात येणार आहे.




**'या' तारखेनंतरचे आदेश रद्द होणार**

११ ऑगस्ट २०२३ च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरित केलेले जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, ज्या प्रकरणांमध्ये केवळ आधारकार्डला पुरावा मानून जन्म-मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. आधार कार्ड हा जन्माचा किंवा जन्म ठिकाणाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही, असे महसूल विभागाने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचा हवाला देऊन स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांच्या देखरेखीखाली विशेष मोहीम राबवून विशेष मेळाव्याद्वारे या कामाचा निपटारा केला जावा असे बजावण्यात आले आहे. **राज्यातील 'ही' शहरे रडारवर !**

अवैध जन्म-मृत्यू प्रकरणांमध्ये राज्यातील काही विशिष्ट शहरे आणि तालुके 'हॉटस्पॉट' असल्याचे दिसून आले आहे. यामध्ये अमरावती, सिल्लोड, अकोला, संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अर्धापूर आणि परळी या ठिकाणांचा समावेश असून, येथील तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना ही प्रकरणे गांभीर्याने तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# शेवगा शिवारात कुत्र्यावर केला बिबट्याने हल्ला..; नागरिकांमध्ये घबराहट

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** शेवगा, तालुका परतूर जिल्हा जालना येथील शेतकरी विशाल शिवाजी काळे यांच्या गट क्रमांक 49 मधील आखाड्यावर दि. 27 नोव्हेंबर रोजी रात्री 7 वाजून 40 मिनिटांनी बिबट्यांनी, कुत्र्यावर आणि गाईच्या वासरावर हल्ला केला त्याच्या हल्यात कुत्रा मृत पावला असून गाईचे वासरू गंभीर जखमी झाले आहे.या गोष्टीमुळे शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये बिबट्याच्या दहशतीने भीतीचे वातावरण पसरले आहे, तसेच विशाल काळे यांच्या शेजारच्या शेतात शेळ्यावर बिबट्या हल्ला करेल या भीतीने जवळच असलेल्या कैलास पहाडे यांच्या शेतातील शेड मध्ये रात्री 11 वाजता शेळ्या आणून बांधल्या आहेत. आमचे प्रतिनिधी अशोक ठोके यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांसी संपर्क केला असता त्यांनी रात्री 11 वाजता शेवगा गावी जाऊन नागरिकांना धीर देऊन, स्वतःची काळजी घेण्याचे सांगितले.शेतकऱ्याने जवळ घुंगराची काठी वापरावी व मोबाईल वर गाणे वाजवावे. शक्यतो एकटे शेतात जाऊ नये असे आवाहन वनरक्षक एम. एम.सय्यद यांनी सांगितले.या पूर्वी राजेगाव,देवडी हादगाव,आवलगाव बुद्रुक शिवारामध्ये बिबट्याच दर्शन झाल आहे.दि.२६



नोव्हेंबर रोजी राजेगाव शिवारात लहू घायतडक हे तुरीच्या पिकांना पाणी देण्यासाठी शेतात गेले असताना त्यांना बिबट्याचे दर्शन झालं होत. बिबट्याला पाहून ते घाबरले व घराकडे पळत सुटले होते.बिबट्याने दोन-तीन वेळेस डरकाळी फोडली त्यावेळेस बाजूच्या शेतकऱ्याने पण गावाकडे पळ काढला होता.गावात एकच चर्चा झाल्यामुळे गावातील जिल्हा परिषद सभापती तथा राष्ट्रवादी नेते कल्याण सपाटे व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती सर्व मिळून बिबट्याला पाहण्यासाठी गेले असता बिबट्या तेथे आढळून आला नाही. बिबट्या तेथून निघून गेल्याच्या पाऊल खुणा दिसल्या होत्या.

# संविधान मूल्यांची जपणूक व्हावी - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## पीएम श्री. केंद्रीय विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**वाशिम :** भारतीय संविधान हे आपल्या देशाच्या प्रगतीचे आधारस्तंभ असून प्रत्येक नागरिकाने संविधानात नमूद केलेल्या मूल्यांचे जतन केले पाहिजे. भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वश्रेष्ठ राज्य घटना असून सर्व नागरिकांनी त्याचा अभ्यास करावा व घटनेने दिलेले अधिकार व कर्तव्याचे पालन करावे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.पीएम श्री.केंद्रीय विद्यालयात संविधान दिन उत्साहात व राष्ट्राभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर बोलत होते .तर विशेष अतिथी म्हणून राजस्थान आर्य महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. शशी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलतांना



जिल्हाधिकारी म्हणाले,भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला समान हक्क देत असल्याने त्याचे पालन करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी संवैधानिक कर्तव्यांची जाणीव ठेवून समाजात आदर्श नागरिक बनावे, असेही त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस हारार्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले आणि मूल्यांचे पालन करण्याची शपथ घेतली. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी विद्यालयातील ग्रंथालयाला भेट देऊन पुस्तक प्रदर्शनाची पाहणी केली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या संविधान विषयक प्रकल्प व माहिती फलकांचे कौतुक त्यांनी केले.कार्यक्रमात , संपूर्ण वर्षभर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल

गजानन मनवर,नमोद शिरसाट, नफीस अहमद, शिवदयाल मिना यांना गोल्डन प्रमाणपत्र प्रदान करून जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य अतुल मून यांनी प्रभावी शब्दांत केले. त्यांनी संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना शालेय कामकाज, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती उपस्थित मान्यवरांना दिली. विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी चालू असलेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक उपक्रमांचा आढावा त्यांनी मांडला. तसेच 'पीएम श्री' या योजनेअंतर्गत विद्यालयात आधुनिक पायाभूत सुविधा, डिजिटल शिक्षण व्यवस्था आणि नवोन्मेशी शैक्षणिक पद्धतींची अंमलबजावणी कशी यशस्वीपणे होत आहे, याची माहितीही त्यांनी दिली. कार्यक्रमाचे संचालन अध्यापिका स्वार्था तोडे यांनी केले. दरम्यान ८ वी ,९ वीच्या विद्यार्थ्यांनी संविधान मूल्यांवर आधारित भाषण, गीत, नाटिका आणि नृत्य सादरीकरण केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

पुढे बोलतांना ते म्हणाले,भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला समान हक्क देत असल्याने त्याचे पालन करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी संवैधानिक कर्तव्यांची जाणीव ठेवून समाजात आदर्श नागरिक बनावे, असेही त्यांनी आवाहन केले.यावेळी विद्यालयातील शिक्षकवर्ग, पालक, विद्यार्थी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दशसूत्री उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यजागर; डॉ.महेंद्र बोरसे यांच्या मार्गदर्शनाला प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दशसूत्री उपक्रमांतर्गत आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

जिल्हाधिकारी दिलीपजी स्वामी यांच्या प्रेरणेने,गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे व केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात बालरोगतज्ज्ञ डॉ.महेंद्र बोरसे यांनी स्वच्छता,पोषण,रोगप्रतिबंधक उपाय आणि निरोगी जीवनशैलीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.त्यांचे प्रेरणादायी सादरीकरण विद्यार्थ्यांना विशेष आवडले.




"आजच्या काळात मुलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे.डॉ.बोरसे यांच्या माहितीपूर्ण आणि संवादात्मक पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना आरोग्यदायी सवयी आत्मसात करण्याची प्रेरणा मिळाली आहे.शिक्षकांनी केलेला समन्वय आणि विद्यार्थी प्रतिसाद पाहता हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला."

— केंद्रप्रमुख फिरोज तडवी

यावेळी समाजसेवक संजय शहापूरकर आणि आरोग्यदूत डिगंबर वाघ यांनीही विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्व समजावून सांगितले.

कार्यक्रमासाठी केंद्रीय मुख्याध्यापक किरण पाटील यांच्यासह शिक्षकवृंदाने सहकार्य केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता आणि आरोग्याबद्दल जागरूकता वाढल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.

"दशसूत्री अंतर्गत घेतलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे.विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक जाणीवा वाढवण्यासाठी अशा कार्यक्रमांची नितांत गरज आहे. डॉ.महेंद्र बोरसे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व उपयुक्त ठरले. शाळा प्रशासनाने घेतलेली ही पुढाकार निश्चितच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण आहे."

— गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे

# महायुतीच्या सर्व उमेदवारांना बहुमताने विजयी करण्याचे हाजी अरफात शेख यांचे खोपिलीकरांना आव्हान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वार्ताहर :** खोपोली निवडणूक सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या माध्यमातून रायगड जिल्ह्याचे निवडणूक प्रमुख भाजप नेते मंत्री आशिष शेलार व आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली मुस्लिम समाजाचे लोकप्रिय नेते माजी अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष तथा नवभारतीय शिव वाहतूक संघटनाचे अध्यक्ष हाजी अरफात शेख यांची सभा प्रभाग क्र.११ मधील महाराजा मंगल कार्यालयात मोठ्या जल्लोषात संपन्न झाली. खोपोली शहराला विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी, आणि



पारदर्शक कारभारासाठी थेट नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारा सह महायुतीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आव्हान यावेळी हाजी अरफात शेख व अनेक वक्त्यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाजपा अल्पसंख्यांक नेते हाजी अरफात शेख , महायुतीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे, खोपोली शहर निवडणूक निरीक्षक प्रकाश बिनेदार व खोपोली सहकारी संपर्क प्रमुख मा.नगराध्यक्ष सुनिलभाई घरत,भाजप अल्पसंख्यांक खोपोली प्रभारी सय्यद अकबर, शहरध्यक्ष अजय इंगूळकर, अल्पसंख्याक समाजाचे जेष्ठ नेते फजल मुल्ला ,विनय मोरे ,विक्रम यशवंतशेठ साबळे, आरिफ शेख,अनवर खोत यांच्या सह अनेक प्रभागातील महायुतीचे उमेदवार व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महायुतीच्या शिंदेचे शेंडेच नगराध्यक्ष होतील अश्या शुभेच्छा देत ह्या वर्षीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सर्वाधिक मताधिक्य मिळविण्याचा मान प्रभाग क्र. ११ मधील भाजप मुस्लिम महिला उमेदवार सानिया शेख व त्यांचे सह उमेदवार विक्रम साबळे यांना द्यायचा आहे असे सांगत ,त्यांना निवडून देण्यासाठी पूर्ण ताकतीने काम करूया व पूर्ण महाराष्ट्राला सानिया शेख या अल्पसंख्याक भगिणीच्या विजयाच्या माध्यमातून भाजप पक्षाची मुस्लिम समाजाच्या प्रति असलेला सकारात्मक संदेश या निमित्ताने देऊया असा आव्हान या निमित्ताने माजी अध्यक्ष अल्पसंख्याक आयोग हाजी अरफात शेख यांनी व्यक्त करत सर्व महायुतीच्या उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.

Best Opportunity For

House Wife
Retired
Teacher
Businessman

We are fastest growing organization
Work Fulltime or Part time as per your requirement
No Target, No Investment
Reward & Recognition
Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

Gauri gaikwad:8898632067

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्यावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला प्रकृती चिंताजनक

■ अहिल्यानगर वरून पुण्याला हलवले,खा. शरदचंद्र पवार जयंत पाटील दुपारी हॉस्पिटलमध्ये घेणार भेट

■ गाडी फोडली, दगडाने, लाकडाने, धारदार शस्त्राने १० ते १५ जणांचा राम खाडेंसह सहाका-यांवर जीवघेणा हल्ला

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी**

**मारुती सत्रे :** राज्याच्या राजकारणात खळबळ उडवणारी धक्कादायक बातमी समोर आली आहे,आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा अध्यक्ष शरदचंद्र पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते आणि सक्रिय सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्यावर बुधवारी रात्री जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. या प्राणघातक हल्ल्यात खाडे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर श्रीदीप रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.परंतु धारदार शस्त्राचे वार,दगडाने,व लाकडाने बेदम १० ते १५ जणांच्या टोकळ्याने मारल्याने पुढील उपचारासाठी पुणे येथील संचेती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.राम खाडे यांच्या सह अन्य ४ जणांवर प्राणघातक हल्ला झाल्याने गुरुवारी दुपारपर्यंत राम खाडे अद्यापही बेशुद्ध अवस्थेत आहेत.या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.हि घटना अहिल्यानगर - बीड जिल्ह्याच्या सीमेलगत अहिल्यानगर सोलापूर हायवेवरील हॉटेल पाटील समोर हा प्रकार घडला हल्लेखोरांनी त्यांची गाडी पूर्णपणे फोडून टाकली आहे. या घटनेची माहिती कळताच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध राजकीय नेत्यांकडून निषेध व्यक्त करण्यात येत असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा खा.शरदचंद्र पवार व जयंत पाटील हे दुपारी संचिती हॉस्पिटल येथे राम खाडे यांची प्रकृतीची पाहणी करणार असल्याची माहिती मिळाली आहे. या हल्ल्याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की अहिल्यानगर कडून आष्टीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरचंद्र पवार पक्षाचे नेते सामाजिक कार्यकर्ते राम खाडे हे त्यांच्या सहकार्यासह आष्टी कडे येत असताना सोलापूर अहिल्यानगर महामार्गावरील हॉटेल पाटील येथे जेवण करून बाहेर येत असताना हा हल्ला रात्री 9 ते 9:15 च्या सुमारास घडला. १० ते १५ हल्लेखोरांनी अचानक त्यांच्यावर हल्ला चढवला. सर्वप्रथम किशोर मुळे यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यानंतर हल्लेखोरांनी राम खाडे यांना गाडीतून बाहेर काढून त्यांना दूर पटांगणात नेऊन मारहाण केली. या हल्ल्यामध्ये राम खाडे यांच्या छातीत जबर मार लागला असून किडनी वरती सूज आहे. डोक्यालाही मार आहे. दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले असून प्रकृती चिंताजनक असल्याने पुणे येथील संचेती हॉस्पिटल मध्ये त्यांना रात्री हलवण्यात आले आहे. त्यांचे सहकारी दीपक खिळे यांनाही जबर मार लागला असून परमेश्वर नागरगोजे यांची बरगडी फॅक्चर झाली असून डोक्याला मार लागला आहे.गणीभाई तांबोळी हे पण समवेत होते. डॉक्टर मुळे यांचा एक डोळा आणि निकामी झाल्याची माहिती मिळाली आहे.

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ते रामभाऊ खाडे यांच्यावर काल अहिल्यानगर येथील मंदाली गावातील एका हॉटेलजवळ अनोळखी व्यक्तींनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्याचा मी जाहीर निषेध करतो. रामभाऊ खाडे हे गेल्या अनेक वर्षांपासून शासनातील भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांचा पर्दाफाश करत आहेत. मध्यंतरी त्यांनी आष्टी तालुक्यातील विविध देवस्थान इनाम जमिन घोटाळा बाहेर काढल्यामुळे त्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या जीविताला धोका होता. म्हणून मी मा. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खाडे यांना सुरक्षा पुरवण्यात यावी अशी मागणी पत्राद्वारे केली होती. तसेच न्यायालयानेही त्यांना पोलिस सुरक्षा दिली होती, मात्र गृह विभागाने कोणाच्या सांगण्यावरून त्यांची सुरक्षा अचानक काढून घेतली याची माहिती नाही. हे अत्यंत धक्कादायक आहे.सरकारच्या भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्याला अशा प्रकारे संपवण्याचे काम केले जात असेल तर महाराष्ट्र पुरोगामी राज्याच्या प्रतिमेला हे शोभणारे नाही. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या प्रकरणात गांभीर्याने लक्ष देत आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना कठोरात कठोर शिक्षा द्यावी.

- आ.जयंत पाटील

सातत्याने भ्रष्टाचारावर आवाज उठवणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आष्टी येथील कार्यकर्ते राम खाडे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना अत्यंत संतापजनक आहे. या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध! न्यायालयाने त्यांना सुरक्षा देण्याचे आदेश देऊनही सुरक्षा पुरवली नसेल तर मग हा सरकार पुरस्कृत हल्ला आहे, असं म्हणावं लागेल. या हल्ल्यातील आरोपी आणि हल्ल्यामागील मास्टरमाईंड याचा पोलिसांनी तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.

- आ.रोहित पवार

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# ग्रामीण भागातील युवकांनी आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे. :- प्रा.सुरज छनवाल

## जयभवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यान

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** - ग्रामिण भागातील युवकांनी आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे! यश मिळतेच असे प्रतिपादन अहिल्यानगर येथील प्रहार ॲकॅडमीचे संचालक प्रा.सुरज छनवाल यांनी केले. ते जय भवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना प्रा. छनवाल म्हणाले की विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध प्रकारच्या संधी व त्या साठी लागणारी शैक्षणिक पात्रता आणि अभ्यासाची दिशा या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या अध्ययक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या वेळी व्यासपीठावर समाजशास्त्र विभाग प्रमुख व महाविद्यालयाचे माजी प्राचार्य



डॉ.सुनील जाधव सर, माजी प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे सर व प्रा.सतिश जरांगे सर हे देखील उपस्थित होते. या प्रसंगी प्रा. डॉ.सुनिल जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षे विषयी पूर्वज्ञान मिळावे म्हणुन महिविद्यालयात अशा व्याख्यानाचे आयोजन संबधीत विभागाच्या वतीने केले जाते. या मधुन विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी!असे त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अहवान केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक या विभागाच्या समन्वयक विद्यापीठ अधिसभा सदस्या श्रीमती प्रा.डॉ.कल्पना हनुमंतराव घारगे यांनी केले. तर आभार राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा.डॉ.सुनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.सिद्धीकी सर, प्रा.डॉ.शिवाजी काकडे सर, प्रा.डॉ.फून्ने सर, प्रा.पापाजी चव्हाण सर यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

# उरण शहराच्या विकासासठी शिवसेना महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडूनद्या:खा. श्रीरंग बारणे

**दैनिक युवक आधार**
**उरण शहर प्रतिनिधी सायली साळुंके :** येत्या 2 डिसेंबर 2025 रोजी उरण नगरपरिषदेची निवडणूक आहे,या निवडणुकीत शिवसेना महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार म्हणून रूपाली तुषार ठाकूर व इतर नगरसेवक पदाच्या उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत,उरण शहर अनेक समस्यांच्या विळख्यात सापडलेले असून वाहतुकीच्या रहदारी पासून स्वच्छतेच्या नावाने शहरात वनवाच आहे. मात्र उरण शहरालाविकासाच्या आणि समृद्धीच्या,महामार्गावर घेऊन जावयाचे असेल तर या निवडणुकीत शिवसेना महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार म्हणून रूपाली तुषार ठाकूर व इतर नगरसेवक पदाच्या उमेदवारभरघोस मतांनी निवडून द्या हे सर्व उमेदवार नगर परिषदेमध्ये उत्तम काम



करतील,मी उरणशहरांतील नागरीकाना जाहीरपणे आव्हान करतो की येत्या दोन तारखेला धनुष्यबाणाचे बटन दाबून सर्व उमेदवाराना निवडून द्या असे प्रतिपादन उरण-मावळविभागाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी उरण येथे केले.ते उरण शहरांतील गणपती चौक येथिल श्रीराम मंदिराच्या सभागृहात शिवसेना महायुतीच्या वतीने आयोजित प्रचार सभेत आपले मार्गदर्शन पर विचार मांडताना बोलत होते.

उरण नगरपरिषद निवडणूक 2025 संदर्भात नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रूपाली तुषार ठाकूर,नगरसेवक पदाचे उमेदवार अनंत मधुकर कोळी, तुषार शंकर ठाकूर, हंसराज महादेव चव्हाण,अशमिल मोहम्मद अली मुकरी या उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवार दिनांक 27 नोव्हेंबर 2025 उरण शहरांतील गणपती चौक येथील श्रीराम मंदिराच्या सभागृहात शिवसेना महायुतीच्या वतीने प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रचार सभेसाठी खासदार श्रीरंग बारणे,शिवसेनेचे महाराष्ट्र सचिव राहुल लोंढे,शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अतुल भगत, उपजिल्हाप्रमुख विनोद साबळे, उरण विधानसभा संपर्कप्रमुख रमेश म्हात्रे,जिल्हा संघटक मेघा दमडे,उपजिल्हा संघटक वैजयंती ठाकूर, युवा सेना जिल्हा संघटक प्रीतम सुर्वे,पनवेल ग्रामीण तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, उरण तालुकाप्रमुख दीपक ठाकूर,शहर प्रमुख सुलेमान शेख, सुनिल भोईर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणेपुढे म्हणाले रायगडात अनेक ठिकाणी शिवसेनेचे सोबत मिळून भाजपा निवडणूक लढवत आहे.अनेक ठिकाणी भाजपा स्व बळावर निवडणूक लढवीत आहे. उरण मध्ये शिवसेनेचे पक्षाच्या उमेदवारांना विश्वासात घेतलेनाही.म्हणून शिवसेना महायुतीचे स्वबळावर निवडणूक लढवीत आहे.आपण सर्व उरण शहरांतील नागरिकांनी शिवसेना महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्याअसे अव्हानत्यंनी शेवटी केले.

यावेळी केलेल्या प्रास्ताविक मध्ये तालुकाप्रमुख दीपक ठाकूर यांनी शिवसेना महायुतीचे उमेदवारांची ओळख करून दिली.पक्षाची भूमिका कायअसेल ते स्पष्ट केले.यावेळी दीपक ठाकूर यानी खासदार श्रीरंग बारणे यांच्यावर केलेल्या टिकेला प्रत्युत्तर दिले. यावेळी उपस्थित असलेले जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांनी आक्रमक भूमिका घेत आमदार महेश बालदी व सत्ताधारी पक्षाला धारेवर धरले.उरण मध्ये पहिल्यांदाच एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवीत असल्याचे त्यांनी सांगितले

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रुपाली तुषार ठाकूर यांनी आपल्या आक्रमक शैलीमध्ये सत्ताधारी पक्षाने केलेल्या उरणच्या विकासाची चिरफाड केली त्यांनी उरण मधील विविध नागरी समस्या वर बोट दाखवत वीज पाणी रस्ते स्वच्छतागृह आदी विषयावर आवाज उठविला.

# मांडोदेवी देवस्थान परिसरात ‘जो शिकला तो टिकला’ चित्रपटाचे शूटिंग संपन्न; लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार चित्रपट

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी गोंदिया**
**आमगाव :-**मांडोदेवी देवस्थान या निसर्गरम्य व धार्मिक परिसरात राज सुंदरी फिल्म मुंबई द्वारा मराठी चित्रपट ‘जो शिकला तो टिकला’ च्या शूटिंगला मोठी उत्सुकता लाभली. निर्माते–दिग्दर्शक यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या काही दिवसांपासून चित्रपटातील महत्त्वपूर्ण दृश्यांचे चित्रीकरण येथे पार पडले. मंदिर परिसर, सभोवतालचा डोंगराळ भाग, तसेच स्थानिक गावांचा समावेश असलेल्या विविध लोकेशन्सवर कलाकारांनी आपल्या भूमिकांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

चित्रीकरणादरम्यान स्थानिकांमध्येही मोठी उत्सुकता दिसून आली. अनेकांनी शूटिंग पाहण्यासाठी



देवस्थान परिसरात गर्दी केली. कलाकार, तांत्रिक विभाग, कॅमेरामन, प्रोडूक्शन मॅनेजर आणि दिग्दर्शन टीम यांनी परिसरातील संस्कृती, लोकजीवन आणि नैसर्गिक सौंदर्य टिपण्यात विशेष रस दाखवला.

‘जो शिकला तो टिकला’ हा सामाजिक कथानकावर आधारित चित्रपट असून शिक्षण, संघर्ष, आणि पुढे जाण्याची जिद्द या विषयांवर आधारित असल्याचे चित्रपटसृष्टीतून प्राथमिक माहिती मिळते. ग्रामीण भागातील तरुणांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारा प्रेरणादायी संदेश या चित्रपटातून दिला जाणार असल्याचे समजते.

चित्रपटाचे पोस्ट-प्रॉडक्शनचे काम सध्या जोरात सुरू आहे. निर्मात्यांच्या माहितीनुसार, चित्रपटाचे प्रदर्शन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून अधिकृत प्रदर्शित दिनांक लवकरच जाहीर केला जाणार आहे.

**स्थानीय प्रशासन आणि देवस्थान समितीचे सहकार्य**

चित्रीकरणासाठी आवश्यक परवानग्या मिळविण्यात स्थानिक प्रशासन तसेच मांडोदेवी देवस्थान समितीने सहकार्य केले. परिसरात स्वच्छता, सुरक्षेची व्यवस्था आणि सुविधा पुरविण्यातही स्थानिक पातळीवर उत्तम व्यवस्थापन दिसून आले.

**स्थानिकांसाठी अभिमानाची बाब**

मांडोदेवी देवस्थान परिसरात चित्रपटाचे शूटिंग झाल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून, या निमित्ताने परिसराच्या प्रसिद्धीत भर पडणार असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर येथे पर्यटन आणि भाविकांची वाढती गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे

# 'जागर संविधानाचा' निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा गौरव!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड:** संविधानाचे महत्त्व जनमानसात रुजवण्यासाठी सत्यशील संघटनेने संविधान दिनानिमित्त पालोद येथे आयोजित केलेल्या 'जागर संविधानाचा' भव्य निबंध स्पर्धेत सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या स्पर्धेतील यशस्वी सहभागाबद्दल विद्यार्थ्यांना नुकतेच सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन विद्यालयामध्ये करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वितरण विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक काकडे यांनी सत्यशील संघटनेच्या या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. "अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये



संविधानाबद्दल जागरूकता वाढते. भविष्यात या स्पर्धेत अजून जास्त विद्यार्थी सहभागी होतील," अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमात 'जागर संविधान' टीमचे अध्यक्ष अविनाश दांडगे यांनी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर काकडे आणि विद्यालयाचे विशेष आभार मानले. विद्यालयाने दिलेल्या सहकार्यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाला, असे त्यांनी नमूद केले.या गौरव सोहळयाला उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर, सतीश बिऱ्हारे, गजानन वाघ, रफिक भाई, अजय दांडगे, आकाश गायकवाड, यश दांडगे, सागर दांडगे, ऋषिकेश इंगळे यांच्यासह विद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# वन विभाग ताहाराबाद प्रादेशिक कार्यालयाची बेधडक कारवाई; अवैध वृक्षतोड बागलाण पश्चिम पट्ट्यात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**बागलाण तालुका प्रतिनिधी- दिपक गायकवाड/**
**बागलाण :** तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात अवैद्य वृक्षतोड बाबत वृत्तपत्रात अनेकदा मुद्दा एरणीवर येत,बागलाण तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्रात पसरलेल्या वनविभागाच्या हद्दीतील वनपरिक्षेत्रात वृक्षतोड होताना दिसत असते वनकर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरू असल्याने तालुक्यातील वनसंपदा धोक्यात आली आहे शासनाच्या विविध योजना निष्फळ ठरत आहेत.



वनक्षेत्रात सुरू असलेली अवैध वृक्षतोड व चराई करणाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याची मागणी निसर्ग प्रेमी करत असतात त्यामुळे नैसर्गिक संतुलन राहण्यास वृक्ष संवर्धन,वृक्ष वाढ होणे गरजेचे आहे त्यामुळे प्रजन्य मान सामान्य राहते हा निसर्ग नियम असून वनविभागाच्या वनपरिक्षेत्र ताहाराबाद, पूर्व विभाग यांच्या अंतर्गत नियत क्षेत्र साल्हेर परिमंडळात अवैध वृक्षतोड होऊन,वाहतूक होताना परिमंडळ अधिकारी यांना गुप्त माहिती समजले त्या अनुषंगाने साल्हेर वनरक्षक दत्तू चिंतामण गुंजाळ यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शक सूचनानुसार दिनांक २७/११/२०२५ वार गुरुवार रोजी मौजे बाभुळने येथे अवैध लाकडांचा ट्रक भरत असल्याने राऊंड स्टाफ(टीम) समवेत जाऊन मौजे अजंदे गावालगत ट्रक क्रमांक MH18 M-5575 पकडला असून ड्रायव्हर कडे परवाना नसल्याचा उघड झाले आहे आंब्याचे लाकूड ट्रक मध्ये दिसून आले यावरून ड्रायव्हर जुबेर अहमद रफिक अहमद राहणार मालेगाव खोली नं ९७५ हजार खोली व गाडी मालक मिरझा मुश्रीफ शाहिह बेग रा.मालेगाव यांच्यावर अजंदे गावालगत रस्त्यावर वाहन पकडून जीपीएस रिडींग घेत महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४(३) अन्वये गुन्हा दाखल केला असून अवैद्य वृक्षतोड करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# राज्यातील धनगर समाजाच्या आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे :** घटनादत्त एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी गेल्या कित्येक दशकांपासून लढा सुरु असून राज्यभरात शेकडो आंदोलने झाली, हजारो बांधवांवर गुन्हे दाखल झालेत. शेकडो बांधवांनी उपोषणे केली, लाखोंचे मोर्चे निघाले परंतू समाजाला न्याय मिळाला नाही.

त्यामुळे राज्यभरातील समाज बांधव, माता-भगिनी, मुलांना घेवून २१ जानेवारी २०२६ रोजी आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन करणार असल्याची माहिती मल्हार योध्दा दिपकभाऊ बोऱ्हाडे यांनी



मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लेखी आश्वासन दिल्यामुळे २०१४ साली धनगर समाज भाजपासोबत गेला. धनगरांनी मोदींना पंतप्रधान आणि फडणवीसांना मुख्यमंत्री बनवले याच उपकाराची जाणीव ठेवून दिलेला शब्द पाळण्याऐवजी त्यांनी धनगरांना मुर्ख बनवले असे दिपकभाऊ बोऱ्हाडे यांनी यावेळी सांगितले.

सप्टेंबर मध्ये मी स्वतः जालना येथे १६ दिवस आमरण उपोषण केले. राज्यातील एक ऐतिहासिक आंदोलन जालना येथे झाले.

परंतू सरकारला अजुनही जाग आली नाही. त्यामुळे आता माघार नाही असे बोऱ्हाडे यांनी सांगितले. यावेळी धनगर समाजाचे प्रमुख महादेव अर्जुन, अशोकराव पातोड, प्रल्हाद नेमाने, निखिल वीर, अमोल गावडे, शाम बोऱ्हाडे, प्राध्यापक राजाराम काळे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# सेन्यार आणि मोन्था चक्रीवादळाचा महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा वगळता हवामानात काही विशेष परिणाम दिसून येणार नाही

**दैनिक युवक आधार**
**उमाकांत पानसरे**
**उरण प्रतिनिधी** : सध्या बंगालच्या उपसागरांमध्ये घोंगावत असणाऱ्या ' सेन्यार ' या चक्रीवादळाचा परिणाम महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा या ठिकाणी काही जिल्ह्यांमध्ये कमी ते जोरदार पावसाच्या स्वरूपात पाहायला मिळू शकतो , परंतु रायगड जिल्ह्यातील पनवेल हे मुंबई-पुण्याला जोडणारे महत्त्वाचे ठिकाण असल्याने, येथील हवामान अंदाज रायगड जिल्ह्यातील इतर किनारपट्टीच्या भागांपेक्षा जसे की उरण आणि अलिबागला थोड वेगळ असू शकतय विशेषतः रात्रीच्या तापमानात स्कायमेट आणि हवामान खात्याच्या ताज्या अंदाजानुसार, पनवेल तसेच उरण , अलिबाग या किनारपट्टीच्या



भागांमध्ये हवामान स्वच्छ आणि कोरडे राहील. वाऱ्याचा वेग कमी असल्याने रात्रीच्या वातावरणात सुखद गारवा असेल. त्यामुळे ' सेन्यार ' या चक्रीवादळाचा रायगड जिल्ह्याच्या सर्वच तालुक्यांमध्ये काही विशेष परिणाम दिसून येणार नाही.

# श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव’

## शनिवारी सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे गायन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** सदगुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळोजे मजकूर योगीनगर (धोंडळी) परिसरात दरवर्षी प्रमाणे भक्तिभाव आणि अध्यात्मिक उत्साहात ‘श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. श्री नवनाथ सेवा मंडळ योगीनगर (धोंडळी) यांच्यावतीने आयोजित हा उत्सव स्थानिक भक्तांसह संपूर्ण परिसरातील भाविकांसाठी अनन्यसाधारण आकर्षण ठरत आहे.

या वर्षीच्या महोत्सवात शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर रोजी संगीत,



अध्यात्म, भजन आणि प्रवचनांनी युक्त एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्याचा मुख्य आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन व अभंगवाणी सादर होणार आहे. श्री स्वामी समर्थ मठ मंदिराच्या भव्य प्रांगणात संध्याकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा सांगीतिक सोहळा रंगणार आहे.पं. उमेश चौधरी यांच्या सुमधुर गायनाला तबल्यावर प्रसाद पाध्ये, पखवाजावर ॲड. सूरज गोंधळी, हार्मोनियमवर सुप्रिया जोशी, तर टाळ वाद्यावर गुरुदास कदम अशी अनुभवी कलाकारांची प्रभावी साथ लाभणार आहे. कार्यक्रमातील सूत्रसंचालन व निवेदनाची जबाबदारी सोपान आडव सांभाळणार आहेत.

या संगीत कार्यक्रमापूर्वी वातावरण अधिक अध्यात्मिक करणारे दोन विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यामध्ये सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. निवृत्ती महाराज यांचे प्रवचन तर सायंकाळी ५ वाजता बालगोपाल हरिपाठ मंडळ, घोट यांचा हरिपाठ कार्यक्रम होणार आहे. या उत्सवानिमित्त श्री नवनाथ सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी भाविकांच्या मोठ्या उपस्थितीचा विचार करून मंदिर परिसरात आवश्यक त्या सर्व सुविधा, प्रकाशयोजना, ध्वनीव्यवस्था तसेच दर्शन व्यवस्थेची उत्तम तयारी केली आहे.

## थोडक्यात

### खारघरसह तळोजातील घरफोडीत लाखोंचा मुद्देमाल लंपास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल तालुक्यातील खारघरसह तळोजात झालेल्या घरफोडीत लाखोंचा मुद्देमाल लंपास झाल्याची घटना घडली आहे .खारघर सेक्टर ३५ मध्ये चोरांनी गॅलरीतून घरात प्रवेश करत मायलेकी झोपल्या असताना ५० हजारांचा मुद्देमाल चोरी केला होता. तर तळोजा उपनगरातील फेस १ येथील सेक्टर १५ मधील पार्वती होम्स या इमारतीमध्ये मध्यरात्री चोरट्यांनी दोन घरफोड्या करून लाखोंचा मुद्देमाल पळवला आहे. ही चोरी मध्यरात्री दोन ते पहाटे सहा वाजण्याच्या दरम्यान झाली आहे . यात सेक्टर १५ येथील पार्वती होम्स या इमारतीमधील २०१ आणि २०२ या सदनिकांना चोरट्यांनी लक्ष्य केले. उघड्या गॅलरीमधून चोरटे घरात शिरले. तळोजातील या दोन्ही सदनिकांतून दोन लाखांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरला.

### उबेर चालकाला लुटले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** तालुक्यातील मुर्बी गाव, सेक्टर १९ या ठिकाणी तीन अनोळखी व्यक्तींनी भांडणाचा बहाणा करून उबेर चालकाकडून रोख रक्कम, मोबाइल आणि टॅक्सीची चावी नेल्याप्रकरणी तिघांवर खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.मोहम्मद सिद्दिकी हे बीकेसी (रा. मुंबई) यांना खारघरचे भाडे आले. ते खारघरमध्ये प्रवाशाला सोडून घरी परत जात असताना लघुशंकेसाठी त्यांनी मुर्बी गाव, सेक्टर १९ येथे गाडी पार्क केली. परत गाडीकडे जाताना दुचाकीवर निघालेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी गाडी थांबवून त्यांना दमदाटी केली. मोहम्मद यांच्याकडील मोबाइल, पंधराशे रुपये रोख रक्कम आणि गाडीची चावी हिसकावून ते निघून गेले.

### एटीएम कार्डची अदलाबदल करून काढले ४५ हजार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** एटीएम कार्डची अदलाबदल करून ४५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांवर कळंबोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मानस समल (रा. तळोजा फेज वन) हे कळंबोली येथील एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी गेले. ते पैसे काढत असताना एटीएम सेंटरमध्ये असलेल्या दोघांपैकी हेल्मेट घातलेल्या एकाने मशीनमध्ये पिन टाकत असताना पिन क्रमांक पाहून घेतला. तसेच यात पैसे नाहीत, असेही त्यांने सांगितले. त्यानंतर चेक करतो, असे सांगत दुसऱ्या इसमाने समल याच्याकडील एटीएम कार्ड पुन्हा मशीनमध्ये टाकले आणि यात पैसे नाही, असे बोलून दोघे निघून गेले. समल याने दोन वेळा पिन टाकला असता मशीन चुकीचा पिन असल्याचे दर्शवत होते. त्याने कार्ड पाहिले असता एटीएम कार्ड त्याचे नसल्याचे समजले. त्यांनी बाहेर जाऊन दोन्ही इसमांचा शोध घेतला, मात्र ते निघून गेले होते. त्यानंतर ४५ हजार रुपये एटीएम सेंटरमधून काढल्याचा मेसेज त्यांना आल्यानंतर त्यांनी पोलिस ठाणे गाठले.

### दोन हजार १०० रुपयांचा एअरफ्रायर ग्राहकाला पडला तब्बल ७० हजारांना मोबाइलचा एक्सेस घेऊन केली फसवणूक, पोलिस ठाण्यात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** एअरफ्रायरची रद्द झालेल्या ऑर्डरविषयी तक्रार दिल्यानंतर फ्लिपकार्ट या कंपनीचा अधिकारी असल्याचे सांगून व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉलद्वारे मोबाइलचा एक्सेस घेऊन आणि बँक खात्याची माहिती घेऊन ७० हजार १८४ रुपये ट्रान्सफर केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. योगेश प्रभाकर मोहन (कमांडर रेनी सन्स बिल्डिंग, नेरे) यांनी फ्लिपकार्टवर एअरफ्रायरची ऑर्डर दिली. त्यांनी गुगल पेवरून पेमेंट पाठवले. त्यांची ऑर्डर अचानक रद्द झाली. यावेळी त्यांनी एक्स वेबसाईटवरील अकाउंटवरून फ्लिपकार्टच्या वेबसाईटच्या नावे तक्रार करून फ्लिपकार्ट यांना टॅग केले. त्यानंतर संपर्क केला असता व्हिडिओ कॉल करून अॅप दाखवण्यास सांगण्यात आले. व्हॉट्सअॅप वरून व्हिडिओ कॉल आल्यानंतर त्यांना स्क्रीन शेअर करण्यास सांगून स्क्रीन शेअरचा एक्सेस घेत फ्लिपकार्ट ओपन करून दाखवले.अॅप ओपन केल्यानंतर दोनशे रुपयापर्यंतचे दोन प्रॉडक्ट ऑर्डर करण्यास सांगून ते पुन्हा रद्द करण्यास सांगितले, त्यानंतर रिफंड झालेली रक्कम खात्यात जमा झाली का, हे पाहण्यासाठी बँकेचे अॅप ओपन करण्यास सांगितले. त्या वेळी बैंक अकाउंट व डेबिट कार्ड डिटेल टाकण्यास सांगितले. डिटेल दिल्यानंतर दोनशे रुपये जमा होण्याऐवजी त्यातून ७० हजार १८४ रुपये ट्रान्सफर झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गुन्हा दाखल करण्यात आला.

# पाणी गळती रोखण्यात ठाणे महानगर पालिका अपयशी; दिवा प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांची मनमानी सुरू

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी.**

**(ठाणे):-** कल्याण फाटा सर्कलच्या मधोमध पाण्याची पाईपलाईन फुटून हजारो लिटर पाणी रोज वाया जात आहे दोन ते तीन महिन्यापासून ही लाईन लिकीज असून पाण्याची गळती सूरू आहे आणि जवळपास दोन वर्षापासून वॉल लिकीज चा प्रॉब्लेम येथे आहे हा प्रॉब्लेम सॉल करण्यात मात्र दिवा प्रभाग समितीचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी असफल होताना दिसून येतात असाच लिकिज काढण्याचा प्रयत्न रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दिवा प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांनी केला मात्र त्यांना मूळ समस्या कुठे आहे हेच शोधता आले



नसल्यामुळे त्यांचा हा केविलवाना प्रयत्न असफल ठरून तो लिकिज जसाच्या तसा असून अजूनही पाणी रस्त्यावरून वाहत असल्याचे निदर्शनात येत आहे.

तसेच अभय नगर मध्ये सुद्धा असाच प्रॉब्लेम दोन वर्षापासून भेडसावत आहे याकडेही लक्ष देण्यासाठी दिवा प्रभाग समितीचे अधिकाऱ्यांना वेळ नाही वेळोवेळी येथील समस्या आणि त्यावरील उपाय दैनिक युवक आधारचे प्रतिनिधी श्री. रमेश राऊत यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला पण अधिकारी काही केले याकडे लक्ष देत नाही, यांचा वॉल खराब असल्याचे कारण सांगून रात्रभर अभय नगर मध्ये पाणी सोडण्याचे काम येथील वॉलमॅन करीत असतात याबद्दल दिवा प्रभाग समितीचे पाणी विभागाचे उपअभियंता श्री. सुरेश वाघिरे तसेच इंजिनियर श्री.गोसावी यांच्याकडे वारंवार तक्रार करून सुद्धा हे पाणी सोडणे बंद होत नाही त्यामुळे सतत लिकिज असलेल्या पाईपा मधून पाणी रस्त्यावर येऊन रस्त्यात चिखल होत असतो आणि या चिखलातून नागरिकांना तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले कसरत करावी लागते.

जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार करूनही हे अधिकारी या समस्ये कडे लक्ष देत नाहीत आत्ता लवकरच जिल्हाधिकाऱ्यांना स्मरणपत्र देऊन ही समस्या जैसे थे असल्याचे निदर्शनास आणून देण्याचे काम दैनिक युवक आधारचे पत्रकार रमेश राऊत करणार आहे.

अभय नगर मध्ये बऱ्याच दिवसापासून पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे पाण्याच्या वेळेत पाणी कमी दाबाने सोडत असल्यामुळे अभय नगरच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचत नाही पाणी उच्च दाबाने सोडण्याची मागणी वारंवार या अधिकाऱ्यांकडे केली आहे पण पाणी उच्च दाबाने न सोडता कमी दाबाने पाणी रात्रभर सोडत असतात पाण्याचा प्रेशर कमी असल्याने लिकिज पाईप कनेक्शन मधून खराब पाणी लाईन मध्ये जाऊन लोकांच्या घरात दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे हे वारंवार सांगूनही अधिकारी या समस्येकडे लक्ष देत नाहीत.

## भंडारा जिल्हा वकील संघाच्या वतीने जिल्हा न्यायालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा-संविधान दिनाच्या निमित्ताने भंडारा न्यायालयात भंडारा जिल्हा वकील संघाच्या वतीने संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधानाच्या प्रतिमेचे माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी वकील संघाचे अध्यक्ष ॲड.नितीन राहांगडाले, सचिव ॲड.धनंजय बोरकर, ॲड महेंद्र गोस्वामी, ॲड मधुकर वडेटवार, ॲड लोणारे, ॲड नेहा शेंडे, ॲड राकेश सक्सेना यांच्या सह वकील संघाचे सर्व सभासद उपस्थित होते.

## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये 'संविधान गौरव दिन' उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या माध्यमातून बीसीटी लॉ कॉलेज, खांदा कॉलनी येथे संविधान गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहावे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी, पनवेल आर. एन. चव्हाण उपस्थित राहिले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी न्यायाधीश चव्हाण यांनी भविष्यात न्यायालयीन क्षेत्रात काम करताना विद्यार्थ्यांनी कोणता व्यवहार्य आणि कृतिशील दृष्टिकोन ठेवावा, तसेच न्यायालयीन प्रक्रियेत व्यावहारिकतेचे महत्त्व काय आहे याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रास्ताविका महाविद्यालयाच्या प्राचार्या



डॉ. सानवी देशमुख यांनी केली. जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच तालुका विधी सेवा समितीच्या रिटेनर ॲड. स्वाती सोनवणे, पॅनल ॲड. दिपाली बोहरा आणि पी.एल.व्ही. शैलेश कोंडसकर यांनी संविधान गौरव दिनाच्या विविध पैलूंबद्दल माहिती दिली.

यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान आणि त्याचे विविध पैलू यावर पोस्टर सादरीकरण प्रमुख मान्यवरांसमोर केले. कार्यक्रमास तालुका विधी सेवा समिती, पनवेलचे पॅनल ॲड. इंद्रजीत भोसले, ॲड. नागेश हिरवे, ॲड. विकी दुसिंग, ॲड. प्रज्ञा भगत तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## विजयश्री राजेंद्र पाटील यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** साने गुरुजी संस्कार साधना पुणे या संस्थेने विजयश्री राजेंद्र पाटील यांना 23 नोव्हेंबर रोजी आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरवले. पनवेल तालुक्यातील शांतीवन येथील अण्णासाहेब सहस्रबुद्धे अनुदानित



माध्यमिक आश्रम शाळेत विजयश्री राजेंद्र पाटील या शिक्षिका आहेत. 2000 पासून त्या सेवेत रुजू होऊन 25 वर्षे आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्या कटिबद्ध आहेत. तालुक्यातील आदिवासी समाजातील ठाकूर जमातीच्या स्त्रियांचे जीवन, आदिवासी भागातील पाणीटंचाई, आदिवासी स्त्रियांमध्ये सिकलसेल एक गंभीर समस्या या विषयावर अभ्यासपूर्ण शोध निबंध त्यांनी लिहीले आहेत. तसेच जिल्ह्यातील आदिवासी समाजातील स्त्रियांच्या जीवनमानावर शिक्षणाचा झालेला परिणाम या विषयावर संशोधन कार्य सुरू आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## पंचायत समिती पनवेल कार्यालयात संविधान दिवस साजरा केला

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पंचायत समिती पनवेल कार्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला. गट विकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. या प्रसंगी सहायक गट विकास अधिकारी राजेंद्र कोलटक्के, पशुधन विकास अधिकारी आनंद मारकवर, गट शिक्षण अधिकारी शाहू सतपाल तसेच गुलाब बहिरम सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पूर्ण स्टाफ उपस्थित होता. या प्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या ठिकाणी संविधान फोटो फ्रेम ठेवण्यात आली होती. गट विकास




अधिकारी यांनी संविधान बाबत आपले विचार व्यक्त केले. चेतन गायकवाड यांनी संविधान शपथ वाचन केले व त्यांच्या मागून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी संविधान शपथ घेतली. तसेच 26 नोव्हेंबर 2008 रोजी मुंबई वर जो दहशत वादी हल्ला झाला आणि त्यामध्ये शहीद झालेल्या शहीद लोकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नमुना क्र.७५

### चौकशीची जाहीर नोटीस

2664/25
सायनिक न्यास नोदणी कार्यालय आयुक्त
सर्वगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय कल्पतरु इमारत,
पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि. रायगड दि. 28/11/25

अर्ज क्रमांक: 416/25
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक: AAT Foundation Dronagiri Navi Mumbai Dist Raigad. बाबत.

MR. Madan Anant patil : अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल/अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत (वर्णन) 1000/-

(ब) स्थावर मिळकत : (वर्णन)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या काग्रलयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १४/११/२०२६ रोजी दिली.

(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड विभाग,
रायगड

प्रत:-
१. कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर
२. स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात
३. स्थळप्रत

## जास्त व्याज दराने उच्च परतावाबाबत खोटे आमिष दाखवून 37,75,527/- रुपये लुबाडणाऱ्या गुन्हेगारास उत्तर प्रदेश येथुन अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** जास्त व्याज दराने उच्च परताव्याबाबत खोटे आमिष दाखवून 37,75,527/- रूपये लुबाडणाऱ्या एका गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने नोएडा उत्तर प्रदेश येथुन अटक केली आहे . पनवेल शहरातील ७३ वर्षीय जेष्ठ नागरिकांला आरोपी रविशंकर सुरेशप्रसाद मिश्रा उर्फ बी.एल. पटेल, वय ३० वर्षे, रा. रिवा, राज्य मध्य प्रदेश



यांने आपण ई पी एफ ओ ऑफीस, नवी दिल्ली येथुन बोलत असल्याचे खोटे सांगुन फिर्यादी यांना पेमेंट ऑफ डिव्हिडंड अँड डिपॉजि कॉन्फीर्मशन या शासनाच्या स्किम मध्ये पैसे गुंतवणुक करून त्यामधुन ७ ते ८ महिन्यात जास्त व्याज दराने उच्च परताव्याबाबत खोटे अमिष दाखवून त्यांच्या ॲक्सीस बँक, व स्टेट बँक ऑफ इंडिया, या दोन वेगवेगळया बँकेच्या खात्यामधुन फोन पेद्वारे वेळोवेळी एकुण रूपये ३७,७५,५२७/- स्विकारून त्यांची फसवणुक केली होती . याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पथकाचे पोलीस उपनिरीक्षक अभय कदम, पोहवा निरज थवई, पोशि विद्याधर गायकवाड, पोशि अभय मे-या, पोना प्रवीण पाटील , मपोशि शितल कोकणी आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे सखोल माहिती घेतली असता सदर आरोपी हा नोयडा, मध्य प्रदेश येथे लपून बसल्याचे आढळून आल्याने त्याठिकाणी सदर पथकाने जाऊन सापळा रचून आरोपीला जेरबंद आहे .

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (आनंद पवार)** : महाड येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला.

भारताचे महान संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९५० रोजी राष्ट्राला संविधान प्रदान केले,त्या स्मरणार्थ दरवर्षी संपूर्ण देशात संविधान दिन साजरा केला जातो.त्याच परंपरेनुसार महाड महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सविधान रॅलीने महाड दणाणून गेले.सकाळी १०:३० वाजता महाविद्यालयातून संविधान रॅलीचा प्रारंभ झाला.

**रॅलीचा मार्ग**

महाविद्यालय ते महाड बस स्थानक,प्रांत कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज चौक, ऐतिहासिक चवदार तळे येथे रॅलीचा समारोह करण्यात आला यावेळी विद्यार्थी,शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

"संविधानाचा विजय असो!

"जय भीम! जय संविधान!"

अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

**सेवाभावी संस्थांचे योगदान**

रॅलीतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांसाठी महाड येथील सेवाभावी संस्थांच्या वतीने थंड पेय व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

**महाविद्यालय प्रशासनाचे योगदान**

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.योगेश बोराळे,उपप्राचार्य एस.टी. वानखेडे,आरती वानखेडे,प्राध्यापिका अनुराधा राऊत, एनसीसीचे प्रमुख प्रा.वळवी सर,प्रा.अनंत धवणे सरआदींनी विशेष परिश्रम घेतले

# डॉक्टरांअभावी रुग्णालय आजारी

## लासलगाव ग्रामीण रुग्णालयाची आरोग्यव्यवस्था कोलमडली

**दैनिक युवक आधार**

**लासलगाव प्रतिनिधी महेश साळुंके** : लासलगावातील ग्रामीण परिसरात आरोग्याच्या प्राथमिक सुविधाही पोहोचत नाहीत. अशा वेळी या परिसरातील नागरिकांसाठी ग्रामीण उपजिल्हा रुग्णालय आधारवड ठरते. अपुऱ्या डॉक्टरांच्या संख्येअभावी या परिसरातील गरीब कष्टकरी रुग्णांचे मोठे हाल होत आहेत. एकीकडे सरकार ग्रामीण परिसरात आरोग्य सुविधा पुरवित असल्याचा दावा करत असताना, लासलगावातील आरोग्यव्यवस्था पूर्णत: कोलमडलेली आहे.

लासलगावात ग्रामीण रुग्णालय दहा वर्षांपूर्वी उभारण्यात आले. १०० खाटांची व्यवस्था असलेल्या रुग्णालयासाठी सरकारने कोट्यवधी रुपये खर्च केले असले, तरी अपुरी साधने आणि डॉक्टरांअभावी हे रुग्णालयच आजारी पडले आहे. या सरकारी रुग्णालयात डॉक्टर नसल्यामुळे उपचार केले जात नाहीत, परिणामी गरीब कष्टकरी रुग्णांना खासगी रुग्णालयात



जावे लागत आहे. डॉक्टर नसणे, आवश्यक त्या साधनसामुग्रीचा अभाव असल्यास रुग्णांना निफाड येथील उप-जिल्हा रुग्णालयात पाठविले जाते.

बालरोगतज्ज्ञ, फिजिशिअन सर्जन, वैद्यकीय अधिकारी, हे डॉक्टरच अनेक महिन्या पासून येथे नाहीत. स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत, पण ते अधीक्षक पदा वरती काम करत आहेत. तज्ज्ञ डॉक्टर नसल्याने उपचारांअभावी रुग्णांची हेळसांड होत आहे. परिणामी नाईलाजास्तव गरीब रुग्णांना येथील खासगी रुग्णालयात अथवा दवाखान्यात उपचारासाठी जावे लागते. या रुग्णालयासाठी डॉक्टरांची

> माझ्या मुलाला लासलगाव ग्रामीण रुग्णालयात ऍडमिट केले होते परंतू तेथील नर्स सलाईन लावतांना सलाईन मध्ये कोणतेही इंजेक्शन सोडत नव्हती मी बोलली की इंजेक्शन का सोडत नई माझ्या समोर इंजेक्शन सोडा तर नर्स म्हणाल्या की तुम्ही बाहेर थांबा इंजेक्शन आम्ही सोडत आहे आमच्या वर विश्वास नाही तर कश्याला ऍडमिट होता आमच्या कडे अस बोलून मला बाहेर काढून देण्यांत आले आणि यापेक्षाही भयानक प्रकार माझ्यासोबत घडला असून याबाबत वरिष्ठांकडे मी लवकरच तक्रार करणार आहे
>
> कविता कुमावत, विंचूर


> ०१ नोहेबर पासून लासलगाव ग्रामीण रुग्णालयात मेडिकल ऑफिसर (m o) नाही वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार विनंती करूनही अजूनही मेडिकल ऑफिसर देण्यांत आलेले नाही लासलगाव ग्रामीण रुग्णालय येथे औषधाचा साठा कमी प्रमाणात असल्यामुळे रुग्णांना औषधे बाहेरून आनावी लागतात.
>
> शहेजाद पठान, सामाजिक कार्यकर्ते. लासलगाव

१५ पदे मंजूर असताना प्रत्यक्षात अवघी नऊ पदे भरलेली आहेत. वैद्यकीय अधिकारी, शस्त्रक्रिया, स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ञ,भूलतज्ज्ञ, अशी महत्त्वाची पदे रिक्त आहेत. जिल्हा रुग्णालयात एक्स-रे मशिन आहे, पण हे मशीन कायम आजारी असते बऱ्याच दिवसा पासून छातीचा पोटाचा एक्स-रे काढल्या जात नई त्यामुळे नवीन डिजिटल मशीनची येथे आवश्यकता आहे. सोनोग्राफी दर मंगळवारी फक्त एकच दिवस केली जात आहेत. इतर दिवशी सोनोग्राफी सेवा बंद असल्याने जादा पैसे मोजून गरीब रुग्णांना खासगी सेंटरवर सोनोग्राफीसाठी जाण्याची वेळ येते. उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या अपुऱ्या संख्येबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला जात असल्याचे ग्रामीण रुग्णालय प्रशासनाने सांगितले.

# गुणवंत कामगार प्रभाकर कांबळे यांना "मानद डॉक्टरेट" पदवीने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**सहसंपादक मुकुंद कांबळे / मुंबई (प्रतिनिधी)** : विक्रोळी मुंबई येथील वनिता फाउंडेशन व मिलिंद सेवा सहकारी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र राज्य मुंबई जिल्हाध्यक्ष, विशेष कार्यकारी अधिकारी व गुणवंत कामगार प्रभाकर तुकाराम कांबळे यांना आयएसओ प्राप्त यूनिवर्सल हार्मनी अवॉर्ड कौन्सिल नवी दिल्ली यांच्यावतीने गेली वीस ते पंचवीस वर्षे महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल " मानद डॉक्टरेट " डिलीट" पदवीने सन्मानित करण्यात आले .गुणवंत कामगार प्रभाकर कांबळे यांना राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय ,राज्यस्तरीय तीनशेहून अधिक पुरस्कार प्राप्त झाले असून ज्येष्ठ पत्रकार ,समाजसेवक, आदर्श शिक्षक ,सहकार व कामगार भूषण प्राप्त एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख सर्वत्र असून सहकार विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत प्रमाणित लेखापरीक्षक ऑडिटर ,निवडणूक निर्णय अधिकारी



,प्राधिकृत अधिकारी ,म्हणून काम करताना महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, शाहू महाराज ,यांच्या विचारप्रणालीतून व प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून उजाडलेले घरटं सावरण्याचा प्रयत्न करीत असलेले आई-वडील नावाची संस्था या सर्वांच्या विचाराने उभे राहिलेल्या अति कष्टातून शिक्षण घेऊन नोकरीसाठी व सामाजिक शैक्षणिक कार्य साठी गावापासून ते मुंबई पर्यंत भटकंती करीत असलेला सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे दुःख समजावून घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वन वन भटकत सर्वांना बरोबर घेऊन सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून कार्य करणारे सामाजिक ,शैक्षणिक, कला ,साहित्य ,सहकार ,कामगार ,आरोग्य व पत्रकारिता क्षेत्रात वयाच्या विसाव्या वर्षापासून झोकून देऊन महाराष्ट्र शासनाच्या कल्याणकारी योजना प्रत्यक्ष कृतीच्या व वृत्तपत्र लेखनाच्या माध्यमातून तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे महान कार्य करत असल्याने महाराष्ट्र कामगार कल्याणचा मंडळाने सन 2013 चा " गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार " तसेच इतर सामाजिक संस्थेकडूनही तीनशेहून अधिक पुरस्कार प्राप्त झालेले असून सामाजिक ,सांस्कृतिक, शैक्षणिक, पत्रकारिता व सहकारातून समाजाचा विकास करत मनाची इच्छाशक्ती, कष्ट करण्याची तयारी ,माणसे जोडणारी कला आत्मसात करत माणसे आपलीशी करत सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून प्रगतीकडे वाटचाल सुरू असल्याचे प्रभाकर कांबळे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.गुणवंत कामगार प्रभाकर कांबळे समाजप्रबोधनाचा दीप लावणारे तसेच " मानवसेवा बरोबर समाजसेवा हीच ईश्वर सेवा " या उद्देशाने पत्नीच्या नावाने " वनिता फाउंडेशन " ही सामाजिक संस्था स्थापन करून संस्थेमार्फत विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवून जनतेची सेवा करणे हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून सतत काम करत आहेत .घराघरात भारताचे संविधान पोहोचविण्यासाठी मुंबई शहर व पूर्व उपनगरात " संविधान गौरव " परीक्षेचे आयोजन करून घराघरात संविधान पोहोचवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा असून अनेक व्यक्तींनी त्यांचा लाभ घेतलेला आहे.सह्याद्रीच्या पायथ्याशी असणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील महाराष्ट्र कर्नाटकच्या सीमेला लागून असणाऱ्या चंदगड तालुक्यातील रामपूर या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबात जन्म झाला असून आई-वडील अशिक्षित असताना सुद्धा गरिबीचे चटके सहन करत दुसऱ्याच्या शेतात मोल मजुरी करून पदवी,व पदव्युत्तर व बी .एड .त्याचबरोबर जी डी सी व डी सी एम पऱ्यांचे शिक्षण पूर्ण करून नोकरीनिमित्त पोटाची खळगी भरण्यासाठी महाराष्ट्राची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईत वास्तव केल्यानंतर सुरुवातीच्या काळात प्रायव्हेट कंपनीत नंतर विनाअनुदानित शाळेत शिक्षक म्हणून एक हजार रुपये पगारावरती शिक्षक म्हणून काही दिवस काम केले. त्याचबरोबर सहकारी संस्थेत काम करत जी डी सी चा अभ्यासक्रम पूर्ण केल्याने सहकार विभागात "प्रमाणित लेखापरीक्षक"ऑडिटर निवडणूक निर्णय अधिकारी, वृत्तपत्रलेखक ,मुक्त पत्रकार ,कवी साहित्यिक ,उपसंपादक, सहसंपादक, कार्यकारी संपादक, व्यवस्थापकीय संपादक तसेच एलआयसी व स्टार हेल्थ इन्शुरन्स मेडिक्लेम पॉलिसी प्रतिनिधी, पॅन कार्ड गॅजेट एनजीओ संस्था रजिस्ट्रेशन व ऑडिट ची कामे, व सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यकारी संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीची कामे करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दिल्ली च्या युनिव्हर्सल अवार्ड कौन्सिलने " मानद डॉक्टरेट " पदवी देऊन सन्मानित करण्यात आले आहे त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## आरोग्यसमृद्धी प्रकल्पांतर्गत पौष्टिक रेसिपी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद"



**दैनिक युवक आधार**

**खालापुर/ संतोष शेवाळे** : निरामय हेल्थ फाऊंडेशन व गोदरेज इंटरप्राइजेस ग्रुप यांच्या संयुक्त सहयोगाने आरोग्यसमृद्धी प्रकल्प अंतर्गत महिलांसाठी पोषणयुक्त पाककृती स्पर्धा / पौष्टिक रेसिपी स्पर्धा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात एकूण 37 महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान महिलांनी आपल्या पोषणयुक्त पाककृतीची माहिती दिली. या कार्यक्रमास परीक्षक म्हणून डायजेशन म्हणून सौ अनामिका शर्मा व डॉ. जिज्ञाशा पाटील उपस्थित होत्या. मार्गदर्शक म्हणून ग्रुप ग्रामपंचायत वडवळ चे सरपंच Dnyaneshwar सुतार, गोदरेज इंटरप्राइसेस ग्रुपचे सी. एस.आर. प्रमुख तानाजी चव्हाण, ग्रुप ग्राम पंचायतचे सदस्य, अशा सेविका, अंगणवाडी सेविका उपस्थित होते. तसेच निरामय हेल्थ फाउंडेशन चे प्रकल्प समन्वयक मंगेश भंडारे, स्वप्नील कदम हेल्थ वर्कर दर्शना मरागजे, साक्षी खामकर, पौर्णिमा गायकवाड, नेहा राजपुरकर, जागृती पवार, वैशाली बलकवडे तसेच ग्रुप ग्राम पंचायतचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## सिल्लोडमध्ये 'स्वीप' पथकाकडून मतदान जनजागृती अभियान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -:** आगामी नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सिल्लोड शहरात मतदान जनजागृतीसाठी 'स्वीप' (Systematic Voters' Education and Electoral Participation) पथकामार्फत विशेष अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मतदार शिक्षण आणि मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

दिनांक २८/११/२०२५ रोजी राबवण्यात आलेल्या या अभियानामध्ये स्वीप पथक प्रमुखांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. राजीव फुले आणि किशोर जगताप यांच्या नेतृत्वाखाली हे पथक कार्य करत आहे.

या पथकामध्ये श्रीमती शालिनी काळे,




फिरोज सय्यद, गजेंद्र आवारे , जमीरखान पठाण, राजू आठवले, राजेंद्र सपकाळ, अशोक काळे आणि श्रीमती वंदना कवाल या सदस्यांचा समावेश आहे.

आज सकाळी, शहरातील स्नेह नगर, पोलीस कॉलनी, अबदल शहा नगर, ईदगाह नगर परिसरात या पथकाने नागरिकांशी संवाद साधला. मतदारांना त्यांच्या मतदानाच्या हक्कांबद्दल माहिती दिली आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. पथकाने नागरिकांना येणाऱ्या निवडणुकीत निर्भयपणे आणि उत्साहाने मतदान करण्याचे महत्त्व समजावून सांगितले.

## छायाताई खंडागळे यांना 'प्रेरणा पुरस्कार 2025'; लॉर्ड बुद्धा टेलिव्हिजनच्या वर्धापन दिनी गौरव

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज)** : भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत आंबेडकरी चळवळीत निष्ठेने व समर्पण भावनेने कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यंदा 'प्रेरणा पुरस्कार 2025' द्वारे सन्मान करण्यात आला. लॉर्ड बुद्धा टेलिव्हिजनच्या 15 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या भव्य कार्यक्रमात मुंबईतील समाजसेविका छायाताई संजय खंडागळे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नरिमन पॉईंट, यशवंतराव चव्हाण येथे या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.बोधगया, बिहार येथील भदंत हर्षबोधी तसेच माजी



मंत्री व आमदार राजकुमार बडोले यांच्या शुभहस्ते छायाताई खंडागळे यांचा गौरव करण्यात आला. समाजातील वंचित, घटक घटकांमध्ये बौद्ध विचारांची रुजवात, महिलांच्या हक्कांसाठी सातत्याने केलेले प्रयत्न, शिक्षण व सामाजिक न्यायासाठी त्यांनी बजावलेली भुमिका याची दखल घेत हा मानाचा सन्मान त्यांना देण्यात आला.कार्यक्रमाला विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, मान्यवर, तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन्मानानंतर आपल्या भावना व्यक्त करताना छायाताई खंडागळे म्हणाल्या की, हा सन्मान केवळ माझाच नसून समाजासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक हाताचा, प्रत्येक पावलाचा गौरव आहे.

बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर ठामपणे चालत राहण्याची प्रेरणा हा पुरस्कार मला देतो.

# संत्रा पिकासाठी हवामान आधारित विमा योजनेत सहभागी होण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

**नागपूर** : शेतकऱ्यांच्या फळपिकांना हवामानाच्या धोक्यापासून विमा संरक्षण पुरवून त्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यासाठी राज्य शासनाने संत्रा, मोसंबी व लिंबु या फळपिकांसाठी हवामान आधारित फळपिक विमा योजना लागू केली आहे. यापैकी संत्रा या पिकासाठी नागपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होण्यासाठी ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत आपल्या नजीकच्या बँक शाखेत तसेच 'आपले सरकार सेवा केंद्रा'वर विहित मुदतीत विमा हप्ता भरून सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेतंर्गत हवामान आधारित फळपिक विमा योजना मृग व आंबिया बहारासाठी नागपूर जिल्हयातील संत्रा, मोसंबी फळपिकांसाठी अधिसूचित क्षेत्रामध्ये राबविण्यास मंजुरी मिळाली आहे. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (Farmer ID) दि. १८ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्यामुळे या योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक अंतर्गत (agristack) अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे बंधनकारक आहे.

या योजनेची (आंबिया बहार) प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत. ही योजना अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठीच असून ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतक-यांना ऐच्छिक आहे. योजनेत खातेदारांच्या व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी भाग घेण्यास पात्र आहेत. या योजनेंतर्गत ३० ते ३५ टक्क्यांपर्यंतचे अतिरिक्त ५ टक्के विमा हप्ता दायित्व राज्य शासनाने स्वीकारले असून ३५ टक्क्यांवरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी प्रत्येकी ५०:५० टक्के प्रमाणे भरावयाचा आहे. या योजनेत विभागात प्रति शेतकरी सहभागासाठी कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हे) अशी मर्यादा राहील तसेच जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रती शेतकरी हेक्टर मर्यादेपर्यंत राहील.

अधिसूचित फळपिकापैकी एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहारापैकी कोणत्याही एकाच हंगामाकरीता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल. या फळपीक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतक-यांनी ई-पिक पाहणी करणे बंधनकारक आहे. विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतक-यांचे बँक खाते आधार आधारित पेमेंटसाठी लिंक असणे आवश्यक आहे. केवळ उत्पादनक्षम संत्रा फळबागांना ( ३ वय वर्ष) विमा संरक्षणाचे कवच लागू राहणार आहे.

या योजनेंतर्गत संत्रा पिकासाठी अवेळी पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान, अधिकचे तापमान या हवामान आधारित धोक्यांसाठी १ लाख रुपये विमा संरक्षक रक्कम राहणार असून शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता (५ टक्के रक्कम) म्हणजेच ५ हजार रुपये राहणार आहे. या सर्व प्रकारच्या धोक्यांसाठी विशिष्ट कालावधी नमूद करण्यात आला आहे.

विमा हफ्ता भरण्याची अंतिम तारीख (आंबिया बहार) ३० नोव्हेंबर, २०२५ अशी आहे. यासाठी विमा कंपनी म्हणून युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड निश्चित करण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यात संत्रा या अधिसूचित पिकासाठी नागपूर ग्रामीण, कामठी, हिंगणा, रामटेक, पारशिवनी, काटोल, नरखेड, सावनेर, कळमेश्वर, उमरेड, भिवापूर, कुही या तालुक्यांचा समावेश आहे. नागपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त संत्रा शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होण्यासाठी आपल्या नजीकच्या बँक शाखेत तसेच आपले सरकार सेवा केंद्रावर विहित मुदतीत विमा हप्ता भरून सहभागी व्हावे. शेतकरी ओळखपत्र फार्मर आयडी (farmer id) नसल्यास योजनेत सहभागी होता येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतकरी ओळखपत्र फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे यांनी केले आहे. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी क्षेत्रीय स्तरावर मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी तसेच जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधावा.

# राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेचे १२ वे पर्व; महाअंतिम फेरी पनवेलमध्ये

## ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनिल बर्वे यांचा 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने होणार सन्मान

■ सिने नाट्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांची लाभणार मांदियाळी

■ अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी दिली माहिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दरवर्षी प्रमाणे यंदाही राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला ०१ लाख रूपये आणि मानाचा 'अटल करंडक' देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या वर्षी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सव वर्ष असून या महत्वपूर्ण वर्षानिमित्त यंदा दोन रंगकर्मीचा 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. त्यामध्ये मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील तसेच रंगभूमीवरील एक अत्यंत मान्यवर, अनुभवी अभिनेत्री ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि रंगभूमी व सिनेक्षेत्रातील लोकप्रिय कलाकार सुनिल बर्वे यांना यंदाच्या 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आज (दि. २८ नोव्हेंबर) खांदा कॉलनी येथे पत्रकार परिषदेत दिली.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे यंदाही राज्यस्तरीय 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धेचे १२ वे वर्ष असून त्या संदर्भात विस्तृत माहिती देण्यासाठी खांदा कॉलनी येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांच्या समवेत ज्येष्ठ अभिनेते व स्पर्धा समितीचे सदस्य जयवंत वाडकर, स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते सुव्रत जोशी, भाजपचे नविन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, अमोल खेर, गणेश जगताप, वैभव बुवा आदी उपस्थित होते.

प्रसार माध्यमांना पुढे माहिती देताना उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी सांगितले कि, पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात दिनांक ०५, ०६ आणि ०७ डिसेंबर पर्यंत या स्पर्धेची अंतिम फेरी होणार आहे. यामध्ये राज्यभरातून प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या अंतिम २५ एकांकिका सादर होणार आहेत. या अनुषंगाने पुणे, कोल्हापूर, नाशिक, जळगाव केंद्राच्या प्राथमिक फेरी पार पडली असून रायगड, ठाणे, मुंबई केंद्राची प्राथमिक फेरी बुधवारपासून सुरु झाली आहे ती फेरी ३० नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे. महाअंतिम फेरीचे उदघाटन ०५ डिसेंबर तर पारितोषिक वितरण सोहळा ०७ डिसेंबरला मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने यापूर्वी ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश बुद्धीसागर, जयवंत सावरकर, डॉ. मोहन आगाशे, सतिश पुळेकर यांना सन्मानित करण्यात आले असून यावर्षी सुप्रसिद्ध अभिनेत्री नीना कुलकर्णी व सुप्रसिद्ध अभिनेते सुनिल बर्वे यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील तसेच रंगभूमीवरील एक अत्यंत मान्यवर, अनुभवी अभिनेत्री नीना कुलकर्णी आहेत. नाटक, चित्रपट, दूरदर्शन आणि वेब सिरीज या सर्व माध्यमांत त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. सुनिल बर्वे हे सुद्धा मराठी रंगभूमी, दूरदर्शन व चित्रपट क्षेत्रातील एक लोकप्रिय कलाकार आहेत. त्यांची साधी-सरळ भूमिका ते विनोदी, गंभीर, भावनिक अशा विविध प्रकारच्या भूमिका सहजतेने साकारतात म्हणून ते प्रेक्षकांमध्ये विशेष प्रिय आहेत. त्यामुळे त्यांना पुरस्कार जाहीर करताना खूप आनंद होत असल्याची प्रतिक्रिया यावेळी परेश ठाकूर यांनी व्यक्त केली. त्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ आणि प्रत्येकी ५० हजार रुपये असे आहे. तसेच महाअंतिम फेरीचे परीक्षण रंगभूमी, दूरदर्शन आणि चित्रपट क्षेत्रातील अत्यंत मान्यवर कलाकार म्हणून ओळखले जाणारे आणि सशक्त अभिनयशैली, दमदार आवाज आणि भावपूर्ण मुखअभिनय यामुळे ते प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलेले ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक तसेच मराठी टीव्ही आणि रंगभूमीवरील अभिनेत्री व दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, मराठी रंगभूमी, चित्रपट आणि मालिकांमध्ये काम करणारे अनुभवी अभिनेते सुनील तावडे हे करणार आहेत. त्यात आणखी विशेष म्हणजे प्रसिद्ध मराठी अभिनेते, दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री त्यांच्या खास शैलीत बहारदार सूत्रसंचालन करणार आहेत. तसेच बक्षिस वितरण सोहळ्याच्या दिवशी हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रमही होणार आहे. तसेच हास्य सम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे हे सुद्धा आपली विनोदी कला सादर करणार आहेत, अशीही माहिती त्यांनी देत या वर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय अटल करंडक बहारदार सोहळ्याने अधिक विशेष असणार आहे, त्यामुळे या अटल करंडकाचा जास्तीत जास्त नाट्य रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी पत्रकार परिषेदच्या माध्यमातून केले. या एकांकिका स्पर्धेत राज्यभरातून १०० हुन अधिक एकांकिकांचा सहभाग असतो. नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला आहे. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढत आहे. सांस्कृतिक कट्टा राज्यभर पसरला असून या क्षेत्रातून कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले. तसेच अंतिम फेरीचे परिक्षण नाट्य सिने क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्या नजरेतून होत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. त्याचबरोबरीने स्पर्धेचा ब्रँड अँबेसिडर आणि स्पर्धेचे स्वतःचे शीर्षक गीत असलेली हि महाराष्ट्रातील एकमेव एकांकिका स्पर्धा असून यंदाच्या स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते सुव्रत जोशी असल्याचे सांगण्यात आले. या स्पर्धेसाठी मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक निल ग्रुप तर मिडिया प्रायोजक सन मराठी आणि टीआरपी मराठी हे सोशल मीडिया प्रायोजक आहेत, अशी माहिती कार्यवाह श्यामनाथ पुंडे यांनी यावेळी दिली.



**-------------------अशी आहेत पारितोषिके ---------------------**

प्रथम क्रमांक- ०१ लाख रूपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक
द्वितीय क्रमांक- ७५ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
तृतीय क्रमांक- ५० हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
उत्तेजनार्थ दोन बक्षिसे - प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
लक्षवेधी एकांकिका- ३० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
विनोदी एकांकिका - २० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

---

**- वैयक्तिक पारितोषिके -**

सर्वोत्कृष्ठ- दिग्दर्शक/ अभिनेता/ अभिनेत्री/ लेखक/ नेपथ्य / प्रकाश योजना/ संगीत
प्रथम क्रमांक- ०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
द्वितीय क्रमांक- ०२ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
तृतीय क्रमांक- ०१ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
उत्तेजनार्थ - ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

---

उत्कृष्ट वेशभूषा (कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ)- ०१ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
अतुल परचुरे सर्वोकृष्ठ विनोदी कलाकार - ०२ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
उत्कृष्ट बालकलाकार - ०१ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

---

**प्रत्येक केंद्रावरील सर्वोत्कृष्ट एकांकिका**

प्रथम क्रमांक - ०७ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह
द्वितीय क्रमांक - ०५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

---

अटल करंडक हि स्पर्धा महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाली आहे. हि स्पर्धा दर्जेदार आहे. अशाच स्पर्धेतून आम्ही पुढे आलो आहोत. कलाकारांना वाव देण्याचे काम यातून होत आहे. नव्या पिढीकडे टॅलेंट आणि व्हिजन आहे. महाविद्यालयाच्या थिएटरला अनन्य साधारण महत्व आहे. आणि या स्पर्धेतून दर्जेदार कलाकारांची निर्मिती होत असते त्यामुळे अटल करंडक कलाकारांसाठी मोठे व्यासपीठ आहे.

- ज्येष्ठ कलाकार जयवंत वाडकर

एकांकिकेत वाहवा मिळाल्यानंतर पुढील दिशा मिळत असते. मी सुद्धा एकांकिकांमधून सादर झालो आहे. यश अपयश याची चिंता करायची नाही आपला बेस्ट देण्याचा प्रयत्न करायचा असतो. अटल करंडकमध्ये वयाचे बंधन नाही त्यामुळे प्रत्येकाला संधी असून हा प्लॅटफॉर्म महत्वाचा आहे. त्यामुळे अटल करंडकशी जोडलो गेलो याचा मला आनंद आहे. एकांकिकेतून सकारात्मक जाणिव निर्माण होते. नाटकाचे व्यासपीठ बळ देते आणि निरोगी समाज निर्माण करण्याचे काम एकांकिका करते त्यामुळे एकांकिका सकारात्मक कलाविष्कार आणि प्रेरणा देणारे आहे.

- सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते सुव्रत जोशी

नाट्य चळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्य रसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी "रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा" हे ब्रीदवाक्य घेऊन 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाटयरसिकांच्या गळयातील ताईत बनली असून या स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

# रेवदंडा दिवसा रात्री बेकायदा वाळू वाहतूक RTO– पोलिसांचा निष्काळजीपणा उघड

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** रायगड रेवदंडा आगरकोट किल्ल्यात बंगला -स्विमिंग पूल प्रकरणात महसूल अधिकारी बंद पाकीटात " चिडीचूप" महाराष्ट्र शासन कारवाई करणार का? जनतेचे लक्ष.राज्यात अवैध वाळू उत्खननावर सरकारचा लोखंडी बडगा!कडक परिपत्रक जारी; वाळू तस्करांची पळता भुई थोडी, पण रायगडमध्ये अधिकारी मात्र गप्प!राज्यात बेकायदा गौण खनिज आणि वाळू उत्खनन मोठ्या प्रमाणावर वाढल्याने राज्याचा महसूल कोट्यवधींनी बुडत आहे आणि पर्यावरणाची प्रचंड हानी होत आहे. ट्रॅक्टर, टिपर, जेसीबी, एक्सॅव्हेटर, बोट, ट्रक, डंपर अशा विविध वाहनांचा उघडपणे गैरवापर होत असल्याचे शासनाच्या सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. ही गंभीर स्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने 26 नोव्हेंबर 2025 रोजी अत्यंत कडक परिपत्रक (GR) जारी करून राज्यातील सर्व यंत्रणांना तातडीची जबाबदारी दिली आहे."GR मधील प्रमुख आदेश –

महसूल, पोलीस, RTO व क्षेत्रीय विभागांनी संयुक्त धडक मोहीम राबवून अवैध उत्खनन आणि वाहतूक तत्काळ थांबवावी.पकडलेल्या वाहनांवर कठोर कारवाई:पहिला गुन्हा – वाहन 30 दिवस जप्त,दुसरा गुन्हा – वाहन 60 दिवस जप्त,तिसरा गुन्हा – वाहन कायम जप्त + नोंदणी रद्द करण्याचा प्रस्ताव + संबंधित चालक/मालकावर फौजदारी गुन्हा .जिल्हा व तालुका पातळीवरील अधिकाऱ्यांनी निर्णयाची अंमलबजावणी



तातडीने करावी; विलंब अथवा टाळाटाळ गंभीर मानली जाणार.09 ऑक्टोबर 2024 चे जुनं परिपत्रक रद्द करून नवीन कडक मार्गदर्शक तत्त्वे लागू.सर्व कारवाईची माहिती प्रसारमाध्यमात जाहीर करणे अनिवार्य; संवेदनशील भागांमध्ये तत्काळ तपासणीचे आदेश.शासनाचा दावा आहे की नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण, महसूल वाचवणे आणि पर्यावरणीय हानी टाळणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांना अवैध उत्खननाची माहिती देण्याचे आवाहनही करण्यात आले असून, त्यांची नावे गोपनीय ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.*रायगडमध्ये मात्र अधिकाऱ्यांचे मौन!आगरकोट परिसरातील अवैध बंगला आणि 50×100 फूट स्विमिंग पूल कसा उभा राहिला?राज्यात GR कडक झाला असला तरी रायगड जिल्ह्यातील काही अधिकाऱ्यांचा संशयास्पद मौन नागरिकांना खटकत आहे. रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात टोलेजंग अवैध बंगला आणि 50×100 फूटाचा स्विमिंग पूल उभा राहिला. यात ट्रक–डंपरमधून अनधिकृत मटेरियल पुरवठा झाल्याचे नागरिक सांगतात. तरीही जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्रांताधिकारी यांची भूमिका चिडीचूप राहिल्याने अनेक प्रश्न उभे राहिले आहेत.स्थानिक नागरिकांमध्ये चर्चा,"काही महसूल अधिकाऱ्यांचा बंद पाकीट संस्कृतीवर विश्वास... तेरी भी चूप, मेरी भी चूप!"अलिबाग–रेवदंडा–रोहा–मुरुड बायपासवर दिवसाढवळ्या वाहतूक;ट्रॅफिक पोलीस आणि पेण RTOकडून छुपा पाठींब्याचा आरोप!*अलिबागमधील HP पेट्रोल पंपाच्या नाक्यावर आणि आसपासच्या बायपासवर ट्रॅक्टर, टिपर, डंपरद्वारे अवैध वाळू वाहतूक दिवस-रात्र सुरू असते. स्थानिकांच्या मते, ही वाहतूक पोलीस आणि RTOच्या नजरेआड जाणे अशक्य आहे. त्यामुळेच पेण RTO आणि वाहतूक पोलिसांकडून छुपा पाठींबा मिळतो असा आरोप नागरिक करीत आहेत.

**जनतेचा एकच सवाल "GR कडक आहे, पण अंमलबजावणी कुठे आहे?**

राज्यातील वाळू माफियांवर सरकारचा बडगा कडक असल तरी प्रत्यक्षात अधिकारीवर्गानेच जबाबदारी न घेतल्यास हा GR केवळ कागदापुरता राहील, असा नागरिकांचा रोष आहे. विशेषतः रायगडमधील अवैध बांधकामे, अवैध मटेरियल सप्लाय आणि वाहतूक दिसत असताना अधिकाऱ्यांचे मौन संशय वाढवणारे आहे.

जनतेचे लक्ष आता एका महत्त्वाच्या प्रश्नावर खिळले आहे.मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री रायगडमधील या अवैध कारभारावर कडक कारवाई करतील का?की वाळू माफियांचा हा उन्माद असाच सुरू राहणार?

# विविध ओबीसी संघटनेच्या वतीने संत तुकाराम सभागृह (बावणे कुणबी समाज) येथे संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा-** शहरातील संत तुकाराम सभागृह (बावणे कुणबी समाज) पोलीस स्टेशनच्या मागे भंडारा शहरात 26 नोव्हेंबर संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सविस्तर वृत्त असे की, 26 जानेवारी 19 50 ला स्वतंत्र भारताची स्वतंत्र राज्यघटना आपल्या देशात लागू करण्यात आली. त्याला 26 नोव्हेंबर 2025 ला 75 वर्षे पूर्ण झालेली आहेत. या भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवानिमित्ताने 26 नोव्हेंबर 2025 ला भारतीय राज्यघटना व नागरिकांची जबाबदारी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले



होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संजय शेंडे लेखक व संविधान अभ्यासक नागपूर, प्रमुख पाहुणे म्हणून उमेश कोराम संयोजक ओबीसी युवा अधिकार मंच , कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी भंडारा जिल्हा संविधान संघर्ष समितीचे अध्यक्ष रोशन जांभुळकर, प्रमुख अतिथी माझी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे उपस्थित होते सर्वप्रथम सर्व पाहुण्यांचे उपस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले, भारताचे संविधान, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारताचे संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.

विक्रम यशस्वी करण्याकरता विष्णुदास जगनाडे, डॉ बाळकृष्ण सार्वे, गोपाल सेलोकर,वामनराव गोंधुळे, संजय मोहतुरे, इंजिनियर त्र्यंबकराव घरडे, सदानंद इलमे, ओबीसी सेवा संघ, जनगणना परिषद ,ओबीसी जागृती संघ ,ओबीसी क्रांती मोर्चा युथ फार सोशल जस्टीस भंडारा ,संविधान बचाव संघर्ष समिती भंडारा यांनी सहकार्य केले. यावेळी मोठ्या संख्येने ओबीसी समाज उपस्थित होता.

# कळंबोलीत महापालिकेच्या अत्याधुनिक शैक्षणिक संकुलाची केली मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** तळोजा आणि कामोठे येथे उभारण्यात येत असलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या अत्याधुनिक शैक्षणिक संकुलाच्या निर्णयाचे स्वागत करत कळंबोली वसाहतीमध्येही अशाच प्रकारचे संकुल उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. स्त्रीशक्ती फाउंडेशनच्या संस्थापिका विजया कदम यांनी आयुक्त महोदयांना निवेदन देत



ही मागणी केली.कदम यांनी निवेदनात नमूद केले आहे की, कळंबोली ही श्रमजीवी वसाहत असून येथे माथाडी कामगार, रिक्षाचालक, भाजी विक्रेते तसेच इतर कष्टकरी कुटुंबांची मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे. सिडकोच्या एलआयजी, केली-केएल प्रकारच्या घरे तसेच बीयूडीपी योजनेतील इमारतींमध्ये हजारो कुटुंबे वास्तव्यास आहेत. या कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

कदम यांनी पुढे म्हटले आहे की, कळंबोली परिसरात खाजगी शाळा असल्या तरी त्यांचे शुल्क सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारे नाही. आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा असल्याने कळंबोलीतही महापालिकेचे शैक्षणिक संकुल उभारणे अत्यावश्यक आहे. वाढती लोकसंख्या, आर्थिक स्तर आणि शैक्षणिक गरज लक्षात घेऊन हा मुद्दा गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी विनंती त्यांनी प्रशासनाकडे केली.या निवेदनाची प्रत आमदार प्रशांत ठाकूर यांनाही पाठविण्यात आली आहे.

# ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांचा 'महात्मा फुले समता' पुरस्काराने गौरव

## समता परिषदेच्या माध्यमातून महात्मा फुलेंचे विचार समाजात रुजविण्याचे महत्वपूर्ण काम - माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह

### देशातील ओबीसी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली काम - माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह

### महात्मा फुले यांच्याकडून शूद्र, अस्पृश्य, स्त्रिया यांच्या न्याय, उन्नतीसाठी महत्वपूर्ण कार्य - डॉ.सुखदेव थोरात

**दैनिक युवक आधार**

**पुणे / प्रतिनिधी** : मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे विचार रुजविण्याचे महत्वपूर्ण काम करत आहे. त्यांचे विचार आजही समाजासाठी तितकेच प्रेरणादायी आहे. देशातील ओबीसींचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्व काम करतो आहे असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह यांनी केले.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले पुण्यतिथीच्या दिवशी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिला जाणारा 'समता पुरस्कार' यावर्षी ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना आज समता भूमी फुले वाडा, पुणे येथे माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामध्ये रुपये एक लक्ष, फुले पगडी, मानपत्र शाल आणि स्मृतीचिन्ह यांचा समावेश आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सन्मान पत्राचे वाचन डॉ.शेफाली भुजबळ यांनी केले.




यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर,प्रा. लक्ष्मण हाके, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष बापू भुजबळ, सत्संग मुंडे, डॉ.स्नेहा सोनकाटे, डॉ. शेफाली भुजबळ, विशाखा भुजबळ,डॉ. सुदर्शन घेरडे, यश बोरावके, मंजिरी धाडगे, प्रीतेश गवळी, पंढरीनाथ बनकर, महिला वैष्णवी सातव यांच्यासह अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी व राज्यभरातील समता सैनिक उपस्थितीत होते.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह म्हणाले की, ते म्हणाले की सन २००६ पासून मंत्री छगन भुजबळ व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेशी जोडलो गेलो. बिहार राज्यात ओबीसींच्या प्रश्नांवर मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली विविध मेळावे घेऊन ओबीसी बांधवांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला जात आहे. देशातील ओबीसी समाजासाठी मंत्री छगन भुजबळ यांचा लढा सुरु असून त्यांचे योगदान हे अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसींचे हे काम सुरूच राहील असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

पुरस्काराला उत्तर देतांना ज्येष्ठ विचारवंत डॉ.सुखदेव थोरात म्हणाले की, क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी जातिव्यवस्था अस्पृश्यतेचे विश्लेषण करून थांबले नाहीत; तर त्यांनी शूद्र, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या न्याय आणि उन्नतीसाठी प्रत्यक्ष कार्य केले. जातिभेद निर्मूलन , खालच्या जातीतल्या व्यक्ती आणि स्त्रियांना शिक्षण, सामाजिक राजकीय हक्क, एकेश्वरवाद, तर्कनिष्ठता या सर्व गोष्टींसाठी त्यांनी लढा दिला. महात्मा फुले यांनी शुद्र, दलित, स्त्रिया शेतकरी यांच्या प्रश्नांच्या स्वरूपाचे अध्ययन केले. त्याची जातिव्यवस्थेमध्ये असलेली कारणे शोधली.व त्यावर उपाय सुचविले व त्यांच्यामध्ये परिवर्तन आणण्याकरिता सामाजिक चळवळ उभी केली. त्याकरिता संस्था उभा केल्या व आपल्या हयातीत बदल घडवून आणले. त्यांच्या या कार्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी खंबीरपणे त्यांना साथ दिली असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, महात्मा फुले यांनी आपल्या संशोधनातून शुद्र, अतिशूद्र, दलित, स्त्रिया, शेतकरी व कामगार यांच्या प्रश्नांची उकल केली. महात्मा फुले यांनी शोधून काढले की शूद्र आणि अतिशुद्रांचे शोषण जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेमुळे होते, कारण शूद्र आणि अतिशुद्रांना सर्व आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक अधिकारांपासून वंचित ठेवले गेले होते.त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून समानता, विज्ञानवाद आणि न्याय यांचा पुरस्कार केला. महात्मा फुलेंच्या सामाजिक चळवळीने अनेक समाजसुधारक निर्माण केलेत. त्याला सामाजिक व राजकीय चळवळीना प्रोत्साहन दिले. ही परंपरा शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे नेली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच महात्मा फुले समता परिषदेच्या कार्याचा गौरव करत सन २०१० च्या सुमारास नागपूर येथील विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते "Dalits in India: In Search of a Common Destiny" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले असल्याच्या आठवण त्यांनी यावेळी सांगितली.

यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या की, क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना अज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढले. त्यामुळे आज महिला समाजाच्या मुख्य प्रवाहात विविध क्षेत्रात काम करतांना दिसत आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद वाटचाल करत आहे. ओबीसींच्या न्याय हक्कासाठी मंत्री छगन भुजबळ हे लढा देत आहे. त्यांच्या माध्यमातून फुले वाडा व परिसराचा विकास करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले की, ओबीसींच्या न्याय हक्कासाठी लढणारे मंत्री छगन भुजबळ हे खरे शिलेदार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आपण वाटचाल करत आहोत. देशभरात ओबीसींना त्यांच्या हक्काचा वाटा मिळावा यासाठी लढा दिला जात आहे. आज ओबीसी विद्यार्थ्यांचे शिक्षणातून गळतीचे प्रमाण अधिक आहे. या विद्यार्थ्यांना जेव्हा लोकसंख्येच्या तुलनेत निधी उपलब्ध होईल त्यावेळी खऱ्या अर्थाने त्यांना संधी मिळेल आणि त्यातून सामाजिक समता प्रस्तापित होईल असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करतांना आमदार पंकज भुजबळ म्हणाले की, डॉ. थोरात यांच्या संशोधनाचा पाया हा सामाजिक न्याय व आर्थिक समता आहे. दलित-मागासवर्गीय समाजावरील आर्थिक भेदभाव, ग्रामीण विकास, कृषी अर्थशास्त्र, शिक्षणातील विषमता, गरिबी व सामाजिक बहिष्करण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक पातळीपर्यंत मर्यादित नसून धोरणनिर्मात्यांना दिशा देणारे ठरले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची वाटचाल त्यांनी यावेळी मांडली.

**डॉ.सुखदेव थोरात यांचा परिचय**

भारतीय सामाजिक-आर्थिक विचारविश्वात मोलाची छाप सोडणारे अर्थशास्त्रज्ञ, शिक्षक, अभ्यासक आणि धोरणनिर्माते म्हणून डॉ. सुखदेव थोरात यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. सामाजिक न्याय, आर्थिक समानता आणि शिक्षण सर्वांसाठी खुले करण्याच्या दिशेने त्यांनी केलेल्या कार्याची देशव्यापी दखल घेतली गेली आहे. डॉ.थोरात यांनी सन २००६ ते २०११ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. उच्च शिक्षणाच्या लोकशाहीकरणावर भर देत त्यांनी प्रवेश, शिष्यवृत्ती, मागास समाजातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती यासाठी अनेक धोरणे राबवली. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चचे अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डॅलिट स्टडीजचे संस्थापक संचालक पद भूषवित सामाजिक भेदभाव, जातीय विषमता आणि गरीबीवरील संशोधनाला त्यांनी नवा आयाम दिला.

डॉ. थोरात यांच्या संशोधनाचा पाया हा सामाजिक न्याय व आर्थिक समता आहे. दलित-मागासवर्गीय समाजावरील आर्थिक भेदभाव, ग्रामीण विकास, कृषी अर्थशास्त्र, शिक्षणातील विषमता, गरिबी व सामाजिक बहिष्करण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक पातळीपर्यंत मर्यादित नसून धोरणनिर्मात्यांना दिशा देणारे ठरले आहे. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाच्या मान्यतेत भारत सरकारने त्यांना पद्मश्री सन्मान प्रदान केला. देश-विदेशातील अनेक विद्यापीठांकडून त्यांना सन्माननीय पदव्या, पुरस्कार आणि विशेष गौरवांनी सन्मानित करण्यात आले आहे. अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून पुढे येत आंतरराष्ट्रीय दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ, संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञ बनलेले डॉ. सुखदेव थोरात हे आजच्या भारतासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवतावादी मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था घडविण्याची त्यांची धडपड अजूनही सुरूच आहे.

# जरंग नागदेवताचा दही हांडी रजनीकांत बोरेले हस्ते फोडली हजारो भक्तांच्या उपस्थित संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी महेश पेन्दोर**

**जरंग** : येथील प्रसिध्द नागदेवता त्रिर्थ क्षेत्र मंदिर येथे यात्रेचा प्रारंभ दिनांक 28/11/2025 शुक्रवार पासून झाली.या पूर्वी विधिवत पूजा अर्चना करुण दही हांडी बांधन्यात आली.

पांढरकवडा येथील प्रशिद्द व्हिसल ब्लोअर आणि संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या हस्ते नागदेवतेचा दही हांडी फोडण्यात आली यावेळी संस्थान चे अध्यक्ष विठल राउत, उपाध्यक्ष संजय जाधाव,सचिव वासुदेव राठोड,आणि कारगिल योद्धा अनिल पोले यांच्या उपस्थितीत फोडण्यात





आली

रजनीकांत डालूरामजी बोरेले हस्ते ह.भ.प.दत्ताजी महाराज,माधवजी महाराज हरीपाठ भजन मंडली झूली, संगीता चिकटे,आदिशक्ति हरीपाठ भजन मंडल पांढुर्णा यांचा वस्त्र,नारड,आर्थिक मानधन देवून सत्कार करण्यात आला

नागदेवता तीर्थ क्षेत्र जरंगच्या यात्रेची परंपरा मागील 74 वर्ष पासून सुरु आहे अलीकळे भाविक भक्तांची गर्दी प्रचंड वाढली 28 ,29,30,या तीन दिवसाची यात्रेला जवळ पास एक लाख भक्त येतात.

नागदेवता मंदिर जगरुक्त आहे देशातुन भक्त येतात हे विशेष दही हांडी कार्यक्रमात गणेश ओम प्रकाश सिंघानिया,मुकेश राठोड,तुकाराम गमे, अश्विन पोल,शंकर आड़े,प्रभाकर राउत,अरुण नक्षणे,पांडुरंग सामृतकर, प्रकाश पवार,उमेश राठोड,भास्कर पिदुरकर, नागोराव मेश्राम,महादेव चव्हाण,अण्णाजी भोगेकार,भास्कर खुरसाने,संतोष राउत, बंडु जाधव, अंकुश तोड्साम, अशोक मड़ावी, विठल मोहुर्ले यांची प्रामुख्याने उपस्थिति होती.

# एमपीडीए कारवाई रद्द न झाल्याने सामाजिक कार्यकर्त्यांना खुनाच्या धमक्या;

**खेड पोलिसांत गुन्हा दाखल**

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : राज्यस्तरावर सामाजिक कार्य करणारे अशोकराव टाव्हरे यांना खुनाच्या धमक्या दिल्याप्रकरणी खेड पोलिसांनी अनिकेत नाणेकर, जगदीश नाणेकर तसेच अक्षय गायकवाड, कुमार गायकवाड यांच्यावर अदखलपात्र गुन्हा नोंदवला असून प्रतिबंधात्मक कारवाईची तयारी सुरू आहे.

टाव्हरे यांच्याकडे आरोपी अक्षय गायकवाड याने संकेत उर्फ मॉंटी नाणेकर याच्यावरील एमपीडीए कारवाई शासन स्तरावर रद्द होऊ शकते का, अशी विचारणा केली होती. टाव्हरे यांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून आवश्यक कागदपत्रे मिळवून सहकार्यही केले. मात्र गृह विभागाने संकेत नाणेकर यांच्यावर खुन, खुनाचा प्रयत्न, कट, खंडणी यांसारखे गंभीर गुन्हे असल्याने आणि फिर्यादीवर दहशत निर्माण करून घेतलेला समझोता मुंबई उच्च न्यायालयाने अमान्य ठरवल्याने एमपीडीए कारवाई कायम ठेवली.

कारवाई रद्द न झाल्यामुळे अनिकेत नाणेकर, त्याचे वडील जगदीश नाणेकर, संकेत नाणेकर व गायकवाड बंधूंनी प्रत्यक्ष भेटून टाव्हरे यांना "एमपीडीए रद्द करा, अन्यथा संपवून टाकू" अशी धमकी दिल्याचे टाव्हरे यांनी पोलिसांना सांगितले.

अक्षय गायकवाड हा सोशल मिडियावर संकेत नाणेकरसोबतचे कारागृहातील फोटो व्हायरल करून दहशत निर्माण करत असल्याचे समोर आले आहे. नाणेकर टोळी चाकण, म्हाळुंगे व राजगुरुनगर परिसरात खंडणी आणि हप्तेवसुली करत असल्याची नागरिकांची तक्रार असून अनेकजण भीतीमुळे पुढे येत नाहीत. अशोकराव टाव्हरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तातडीने कारवाईचे आदेश देण्याची मागणी केली आहे.

# लोणी गावाचा गौरव! प्रामाणिकपणाचे अनोखे उदाहरण; युवक महादेव सांगळे यांचा नागरी सत्कार



**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे**

" लोणी गावातील आदर्श आणि कर्तृत्ववान युवक श्री. महादेव बापूराव सांगळे यांनी आपल्या प्रामाणिक वर्तणुकीने संपूर्ण समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अहिल्यानगर येथे गुरु गणेश ट्रॅव्हल्समध्ये ड्रायव्हर म्हणून कार्यरत असलेल्या सांगळे यांनी लक्झरी बसमध्ये प्रवास करणाऱ्या एका तरुणीचे हरवलेले रु. 1 लाख 30 हजार रुपये स्वतः फोन करून तिला सुरक्षितरीत्या परत केले.

सापडलेली इतकी मोठी रक्कम कोणत्याही मोहाला न लागता संबंधित मालकापर्यंत पोहोचवण्याचे काम सांगळे यांनी प्रामाणिकपणे पार पाडले. त्यांच्या या कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि आदर्श वागणुकीमुळे संपूर्ण लोणी गावाचा सन्मान वाढला आहे.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी आज लोणी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांनी सांगळे यांच्या प्रामाणिकतेचे मनापासून कौतुक करत त्यांना सामाजिक आदर्श ठरल्याचे गौरवोद्गार काढले.अशा प्रामाणिक तरुणांमुळे समाजात सकारात्मकता आणि मूल्यांचा दीप उजळतो, अशी भावना या प्रसंगी व्यक्त करण्यात आली.

# पोलीस महासंचालक रश्मी शुक्लांकडे कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,(प्रतिनिधी)** अहिल्यानगर जिल्हा पारनेर तालुक्यात बाबुर्डी गावात चर्मकार समाजाच्या एका महिलेचे जमिनीचे आडवे क्षेत्र शेजारील जमिन मालकाने बेकायदेशीरपणे बांध टाकून उभे केले.अन् याप्रकरणाचा जाब संबंधितास विचारला असता त्यांनी या महिलेला व तिच्या पतीला अश्लील शिवीगाळ करुन जीवे मारण्याची कथित धमकी दिलेली आहे.हे प्रकरण गेल्या चार पाच महिन्यांपूर्वीचे असुनही याप्रकरणात सुपा पोलिसांनी अजुनही त्या लोकांवर कडक कारवाई केलेली नाही.तरी याप्रकरणी कडक कारवाई करावी अशा मागणीचे एक निवेदन राष्ट्रीय चर्मकार संघाचे अध्यक्ष माजी आमदार बाबुराव माने यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना मंगळवारी सादर केले आहे.



बाबुर्डी गावात उज्वला बाबा कदम यांचे ७३.५ गुंठे एवढे जमिनीचे आडवे क्षेत्र रस्त्याच्या कडेला गेल्या २३ वर्षांपासून समांतर पसरलेले होते. पण गेल्या जुनमध्ये बेकायदेशीरपणे या जमिनीच्या अर्ध्या भागात दत्तात्रय बबन गाडगे यांच्या कुटुंबाने बांध घातलाअसा आरोप कदम दांपत्याचा आहे.तसेच अर्धा बांध गाडगे कुटुंबाने आपल्या जमिनीत घालून उज्वला कदम यांची रस्त्याच्या कडेला आडवी असलेली जमिन उभी केली.याबाबत कदम दांपत्याने गाडगे कुटुंबास जाब विचारला असता त्यांनी व त्यांच्या साथीदारांनी कदम दांपत्यास अश्लील-अर्वाच्च शिवीगाळ करुन जीवे मारण्याची, शरीर कापून याच जमिनीत पुरण्याची कथित धमकी गाडगे कुटुब व त्यांच्या साथीदारांनी कदम दांपत्यास दिली.याबाबत सुपा पोलीस ठाण्यात १८ जणांविरुद्ध गुन्हे दाखल झालेले आहेत.परंतु या प्रकरणाच्या तपासात पोलिसांनी काहीही प्रगती केलेली नाही. याकडे राष्ट्रीय चर्मकार संघाने पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांचे लक्ष वेधले आहे.पोलीस महासंचालकांना भेटलेल्या शिष्टमंडळात राष्ट्रीय चर्मकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाबुराव माने यांच्या सोबत मुंबई प्रदेशाध्यक्ष विलास गोरेगावकर ,

अशोक देहरे, पंडित कदम ,अनिल ढेरे,दिलीप दडस, सामाजिक कार्यकर्ते दिलीप गाडेकर,शंकर बळी,सुनील पवार आदी सहभागी झाले होते.उज्वला कदम यांच्या जमिनीचे आडवे क्षेत्र बांध टाकून उभे केल्याप्रकरणी दत्तात्रय बबन गाडगे,छबन बबन गाडगे,प्रणव दत्तात्रय गाडगे,धनश्री छबन गाडगे,विकास नारायण गाडगे, नारायण गाडगे,सिध्दांत शंकर गाडगे,सुनिता शंकर गाडगे,अर्चना दत्तात्रय गाडगे तसेच धनश्रीचे भाऊ व वडील असे १२ जण आणि इतर अनोळखी ६ अशा १८ जणांविरुद्ध गेल्या सप्टेंबर महिन्यातच सुपा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झालेले आहेत.

# हॉस्पिटल्स नागपूरमध्ये अत्याधुनिक रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेची सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी**

**नागपूर :** मिसो रोबोटिक सिस्टीममुळे जागतिक दर्जाचे ऑर्थोपेडिक (हाडांचे) तंत्रज्ञान आता आपल्या शहरातच उपलब्ध झाले आहे. ज्याचा फायदा नागपूर, विदर्भ आणि मध्यप्रदेशातील रुग्णांना होईल.




नागपूर, 26 नोव्हेंबर 2025: अत्यंत अचूक आणि रुग्ण-केंद्रित आरोग्यसेवेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूरने मिसो रोबोटिक सिस्टीमसह आपला “कॉम्प्रिहेन्सिव्ह ॲडव्हान्स्ड रोबोटिक नी रिप्लेसमेंट प्रोग्राम” सुरू केला आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अधिक अचूक, सुरक्षित आणि कमी वेदनादायी होते. त्यामुळे गुडघ्याच्या तीव्र संधिवाताने आणि सांध्यांच्या झिजेमुळे त्रस्त असलेल्या रुग्णांना लवकर बरे होण्यास मदत होते आणि त्यांच्या चालण्याची क्षमता सुधारते.

हा कार्यक्रम विदर्भासाठी एक महत्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, यवतमाळ आणि मध्यप्रदेशातील जबलपूर, छिंदवाडा यासारख्या शहरांमध्ये रुग्णांना जागतिक दर्जाचे हाडांविषयी (ऑर्थोपेडिक) उपचार सेवा मिळू शकणार आहे. या रोबोटिक सिस्टीममुळे वोक्हार्ट हॉस्पिटल रुग्णांना कमी दुखापतीची शस्त्रक्रिया आणि लवकर बरे होण्याची सुविधा देऊन त्यांना वेदनाशिवाय आणि आत्मविश्वासाने आपल्या दैनंदिन आयुष्यात परत येण्यास मदत करेल.

कॉम्प्रिहेन्सिव्ह ॲडव्हान्स्ड रोबोटिक नी रिप्लेसमेंट प्रोग्रामचा भाग म्हणून, वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर रुग्णांना शस्त्रक्रियापूर्वी आणि शस्त्रक्रियेनंतर सुरक्षित आणि सुलभ काळजी देते. रुग्णांची सविस्तर वैद्यकीय तपासणी, डिजिटल इमेजिंग आणि रोबोटिक नियोजन करून प्रत्येक शस्त्रक्रिया रुग्णाच्या वैयक्तिक गरजेनुसार केली जाते. शस्त्रक्रियेनंतर, लवकर बरे होण्यासाठी लवकर हालचाल, वेदना नियंत्रण आणि नियोजित फिजिओथेरपीवर विशेष लक्ष दिले जाते. वैयक्तिक फिजिओथेरपी सत्रांमुळे रुग्णांची ताकद, संतुलन आणि चालण्याची क्षमता सुधारते, ज्यामुळे ते आपल्या दैनंदिन कामकाजात लवकर आणि आत्मविश्वासाने परत येऊ शकतात.

या कार्यक्रमाचे उद्घाटन वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या मॅनेजिंग डायरेक्टर सुश्री जहाबिया खोराकीवाला, वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे ग्रुप सीईओ डॉ. पराग रिंदानी, आणि वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरचे सेंटर हेड श्री. रवी बाघली यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमात या क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांनी आपले मार्गदर्शन केले, ज्यामध्ये डॉ. रोमिल राठी, डॉ. मुकुंद अग्रवाल, डॉ. लघवेंदु शेखर, डॉ. आशिष ठाकूर, डॉ. स्वप्नील गाडगे, डॉ. शांतनू देशमुख आणि डॉ. अंबर दावरे हे रोबोटिक ऑर्थोपेडिक आणि जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन उपस्थित होते.

**रोबोटिक गुडघा प्रत्यारोपणाचे प्रमुख फायदे आणि वैशिष्ट्ये**

मिसो रोबोटिक सिस्टीममुळे वोक्हार्ट हॉस्पिटल्स अचूक ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात आघाडीवर आहे. हे रुग्णांना अनेक फायदे देते, जसे की:

- इम्प्लांट बसवताना अधिक अचूकता आणि योग्य संरेखन
- मांसपेशींना कमी इजा आणि शस्त्रक्रियेतील रक्तस्राव कमी
- शस्त्रक्रियेनंतर वेदना कमी होतात आणि लवकर रिकव्हरी होते
- रुग्णालयात राहण्याचा वेळ कमी होतो, ज्यामुळे रुग्ण लवकर दैनंदिन जीवनात परत येऊ शकतात
- तसेच इम्प्लांट जास्त काळ टिकतो ज्यामुळे चालण्याची क्षमता सुधारते आणि दीर्घकालीन समाधान मिळते.

प्रगत 3D व्हिज्युअलायझेशन आणि शस्त्रक्रियेच्या वेळेची माहिती वापरून हे रोबोटिक सिस्टीम प्रत्येक रुग्णाच्या गुडघ्याच्या रचनेनुसार शस्त्रक्रिया व्यक्तिगत पद्धतीने करण्यास सक्षम बनते. त्यामुळे हाडांची कापणी अचूक होते आणि सांध्यातील लिगामेंट्स योग्य संतुलनात राहतात, ज्यामुळे उपचारांचे परिणाम अधिक दीर्घकाल टिकतात.

सुश्री जहाबिया खोराकीवाला, मॅनेजिंग डायरेक्टर, वोक्हार्ट हॉस्पिटल्स म्हणाल्या: “वोक्हार्टमध्ये आमचे उद्दिष्ट नेहमीच तंत्रज्ञानासोबत रुग्णांची काळजी घेऊन सर्वोत्तम आरोग्यसेवा देणे आहे. नागपूरमध्ये रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण सुरू करणे म्हणजे मध्य भारतातील रुग्णांना अत्यंत अचूक आणि कमी दुखापतीची शस्त्रक्रिया त्यांच्या स्वतःच्या शहरात उपलब्ध करून देण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.”

डॉ. पराग रिंदाणी, ग्रुप सीईओ, वोक्हार्ट हॉस्पिटल्स म्हणाले: “रोबोटिक्स हा ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेचा भविष्यातला मार्ग आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून आपण फक्त शस्त्रक्रियेची अचूकता वाढवत नाही तर रुग्णांच्या बरे होण्याच्या अनुभवालाही सुधारतो. ही प्रगती आमच्या वैद्यकीय उत्कृष्टतेच्या बांधिलकीची पुष्टी करते आणि ज्या प्रत्येक भागात आम्ही सेवा देतो तिथे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा पोहोचवण्याच्या आमच्या दृष्टीकोनाची खात्री देते.”

श्री. रवी बाघली, सेंटर हेड, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर म्हणाले: “ मिसो रोबोटिक सिस्टीमची सुरवात नागपूर आणि विदर्भासाठी अभिमानाचा क्षण आहे. आता रुग्णांना अत्याधुनिक गुडघा उपचारांसाठी मेट्रो शहरांमध्ये जाण्याची गरज नाही. ते आता येथेच, नागपूरमध्ये, जागतिक दर्जाची रोबोटिक शस्त्रक्रिया करू शकतात, ज्यामुळे रुग्ण लवकर बरा होतो आणि परिणाम चांगले मिळतात.”

---

## नागपुरमध्ये बालविवाह निर्मूलनासाठी भव्य रॅली; 'बालविवाह मुक्त महाराष्ट्र' अभियानाला बळ

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर**

**नागपूर :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी “बालविवाह मुक्त महाराष्ट्र – आपला संकल्प अभियान” अंतर्गत आज नागपूर शहरात भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. 15 ऑक्टोबर 2025 ते 26 जानेवारी 2026 या कालावधीत राज्यभर राबवल्या जाणाऱ्या या विशेष उपक्रमाचा भाग म्हणून जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या वतीने या रॅली आयोजन करण्यात आले.



जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. प्रविण उन्हाळे महिला व बाल विकास विभागाचे विभागीय उपआयुक्त दत्तात्रय मुंडे यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. बालविवाह प्रतिबंध, यासंदर्भातील कायदेशीर तरतुदींची माहिती आणि सामाजिक जागरूकता वाढवणे हे रॅलीचे प्रमुख उद्दिष्ट होते.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली सिताबर्डी गांधी चौक येथून प्रारंभ होऊन झिरो मॉईल चौक मार्गे संविधान चौक येथे समारोपीय कार्यक्रम करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास माल्यार्पन करण्यात येऊन उपस्थितांना बालविवाह प्रतिबंधासाठी शपथ देण्यात आली. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण व ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टच्या शाहीना शेख, न्यू व्हिजन फाऊंडेशन प्रियंका होटे यांनी रॅलीच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

जिल्हा परिषदेचे जिल्हा बाल रक्षक समन्वयक प्रसेनजीत गायकवाड, बाल संरक्षण अधिकारी विनोद शेंडे, बाल कल्याण समिती सदस्य विजया शाहा, चाइल्ड हेल्पलाइन 1098 प्रतिनिधी, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट प्रतिनिधी,न्यू व्हिजन फाऊंडेशन प्रतिनिधी, मैत्री नेटवर्क संस्था,सावी फाउंडेशन, सह्याद्री फाउंडेशन तसेच रॅलीमध्ये धिरण कन्या शाळा, मदन गोपाल अग्रवाल विद्यालय, सेवा सदन शिक्षण संस्था, सेंट उर्सुला, सेंट जोसेफ यांसह अनेक शाळांतील विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला व तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय येथील विद्यार्थी यांनी बालविवाह वर पथनाट्य सादर केले.

विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी हातात फलक घेऊन बालविवाह निर्मूलनासंदर्भात घोषणाबाजी केली. या माध्यमातून समाजात बालविवाह न करण्याचे आणि त्यास विरोध करण्याचे प्रभावी आवाहन करण्यात आले. बालविवाहाला नाही, शिक्षणाला होकार” अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी अधिकाऱ्यांनी अभियानाच्या माध्यमातून बालविवाहास प्रतिबंध करून मुलींच्या सुरक्षित, सशक्त आणि प्रगत भविष्यासाठी समाजाने एकत्रित येण्याची आवश्यकता व्यक्त केली.

## स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेत आष्टा जिल्हा परिषद शाळा बीड जिल्ह्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे** : भारत सरकारच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेमध्ये आष्टी तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरीनारायण या शाळेने बीड जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवत फाइव स्टार रेटिंग मिळवली आहे.



जिल्ह्यात प्रथम मूल्यांकन मिळविल्यानंतर शाळेचे राज्यस्तरीय मूल्यांकन करण्यासाठी राज्याचे पथक शाळेला भेट देणार आहे .

या मूल्यांकनानंतर शाळेची फाइव स्टार रेटिंग कायम राहिल्यास दिल्ली येथे शिक्षणमंत्री व मान्यवरांच्या हस्ते आष्टा शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, व पाच विद्यार्थ्यांचा सन्मान केंद्र शासनाच्या वतीने केला जाणार आहे.

शाळेतील स्वच्छता, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, एक पेड माँ के नाम या कार्यक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग ,पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय, व इतर स्वच्छता विषयक बाबींची पाहणी करून शाळेची निवड करण्यात आली आहे. शाळेचे मुख्याध्यापक मुटकुळे रघुनाथ,शाळेचे शिक्षक मच्छिंद्रनाथ जगताप,श्रीरंग खोकले ,नामदेव भिसे, केंद्रप्रमुख धर्मनाथ शिंदे, विजय महाद्वार, उमेश झांबरे,सोमनाथ वाळके, बापू शिंदे, लक्ष्मण खंदारे, श्रीमती हेमलता तरटे, सुनंदा बांगर, सुषमा जाधव, अरूण पवार, अशोक रणसिंग, शिवाजी कोल्हे या सर्व शिक्षक वृंदाच्या व शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या सहकार्याने ही यश मिळाले आहे. या साठी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक सोमनाथ वाळके सर यांनी विषेश परीश्रम घेऊन नोंदणी केली. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे आमदार सुरेश आण्णा धससाहेब, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धससाहेब, आष्टा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्यपती अमरराजे निंबाळकर, नामांकित मराठवाड्यात गौरविण्यात आलेल्या कडा पतसंस्थेचे अध्यक्ष मारूती पठाडे उपाध्यक्ष अशोक लटपटे,सचिव महेशकुमार शिंदे ,सरपंच दैवशाला गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे, उपाध्यक्ष साईनाथ गळगटे, व सर्व सदस्य यांनी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. व पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

---

## राज्यातील 600 सरकारी शाळा बंद करण्याच्या हालचाली : महात्मा फुले यांच्या विचारांशी विश्वासघात

महाराष्ट्रात समाजजागृती, समानता आणि स्त्रीशिक्षणाचे दालन उघडणारे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांची पुण्यतिथी ज्या तळमळीने आपण साजरी करतो, त्याच दिवशी राज्यातील शंभर–दोनशे नव्हे तर सहाशेहून अधिक सरकारी शाळा बंद करण्याच्या हालचाली सुरू आहेत, ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. शिक्षण हा समाजपरिवर्तनाचा कणा मानणाऱ्या फुले दाम्पत्याच्या आदर्शांना हे पाऊल थेट विरोध करणारे आहे







**शिक्षण हा हक्क आहे**

आजही ग्रामीण भागातील आणि बहुजन समाजातील हजारो पालकांची आर्थिक स्थिती खाजगी किंवा इंग्रजी माध्यमांच्या महागड्या शाळा परवडणारी नाही. मग या पालकांनी आपल्या मुलांना अशिक्षित ठेवावे का? सरकारने निवडणुकीच्या तोंडावर कोट्यवधी रुपयांच्या खैराती वाटाव्यात पण त्याच मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या शाळा मात्र बंद कराव्यात — हा कोणता न्याय?

महात्मा फुले म्हणायचे, “शिक्षण हे समाजातील वंचितांना स्वाभिमान देणारे हत्यार आहे.”

मग हे हत्यार गरीबांच्या हातातून काढून घेण्याचा प्रयत्न का ?

आज ज्या प्रकारे शाळा बंद करण्याचे प्रस्ताव पुढे येत आहेत, त्यावरून राज्याला प्रश्न विचारणारी, जागरूक, विचारशील पिढी नको आहे असा संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. श्रीमंतांची मुले प्रगत सुविधांसह उत्तम शिक्षण घेत राहतील, पण गरीब आणि बहुजन समाजातील मुले अडाणी ठेवली तरच त्यांच्याकडून श्रम घेणे सोपे जाईल — अशी गुलामी पुन्हा आणण्याचा संकेत तर नाही ना?

बहुजन समाजाची मुले जर शिकली तर उद्या यांची पालखी कोण वाहणार — हा क्रूर विचार या धोरणामागे दडलेला नाही ना?

ग्रामीण भागातील शिक्षणाचा कणा सरकारी शाळा

शहरांत इंग्रजी माध्यमाच्या शाळा असल्या तरी ग्रामीण आणि आदिवासी भागात जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या शाळाच आशेचा किरण आहेत.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या कष्टामुळे अनेक शाळांनी उत्तम निकाल मिळवले, उपक्रम राबवले आणि विद्यार्थ्यांना प्रगतीची नवी दिशा दिली आहे.

अगदी मागच्या महिन्यातच एका दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या मुलीची निवड नासाच्या प्रशिक्षण शिबिरासाठी झाली. ही घटना सरकारी शाळांची गुणवत्ता सिद्ध करणारी आहे.

अशा शाळा बंद झाल्या तर अशा गुणवंत विद्यार्थ्यांचे भविष्य काळोखात जाईल.

आज बहुजन समाजातील अनेक सर्वपक्षीय नेते मौन बाळगताना दिसतात. कारण त्यांचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे त त्यांना स्वतःच्या पुढच्या पिढ्यांसाठी संपत्ती जमा करायची आहे, मग गरीबांच्या शाळा वाचवण्याची त्यांना का चिंता असावी?

■ पण हा देश फक्त नेत्यांचा नाही — हा देश सामान्य नागरिकांचा आहे.

**■ सामान्य नागरिकांनी आता जागे व्हायला हवे**

■ शिक्षण हा कोणत्याही राष्ट्राचा पाया आहे. सरकारी शाळा बंद करणे म्हणजे राष्ट्राच्या पाया खोदणे.

■ आज आपण जागे झालो नाही तर उद्या आपल्या मुलांचे भविष्य सरकारच्या प्रयोगशाळेत बळी पडेल.

■ सरकारी शाळा वाचल्या पाहिजेत.

■ बहुजनांच्या शिक्षणाचा हक्क अबाधित राहिला पाहिजे.

■ शिक्षकांच्या श्रमाला न्याय मिळाला पाहिजे.

■ हाच महात्मा फुले यांच्या कार्याला आणि विचारांना खरी आदरांजली असेल.

## प्रभाग क्र. 2 मधून प्रवीण पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करा

**दैनिक युवक आधार**

**पेण दीपक लोके** : आपला हक्काचा माणूस होतकरू हीत करू माणूस गेली ९ वर्ष 2016 च्या नगरपालिका इलेक्शन नंतर सातत्याने प्रभाग २ मधल्या नागरी सुविधा समस्या जाणून घेऊन झटणारा त्वरित समस्या सोडवणारा आपल्या मतदारांकडून उम्मीद असलेला उमेदवार सेवाहेच व्रत घेऊन सेवक म्हणून काम करणाऱ्या प्रवीण शंकर पाटील यांना चिन्ह /निशाणी रीक्षापुढील बटण दाबून कर्तव्य बजवा त्याच्या साठी मी अशोक जैन यांनी अपक्ष उमेदवारी मागे घेऊन बिनशर्त पाठींबा दिला कारण मला जे अपेक्षित नागरिकांनाही तेच अपेक्षित म्हणून प्रवीण पाटील आपल्या अपेक्षाला खरा उतरेल याची ग्वाही व खात्री देतो.नागरी सुविधा स्वच्छ पाणी ' खड्डे न पडलेले रस्ते ' वीज व आरोग्य हे आपल्याला अपेक्षित आहे हे मला माहिती आहे आपल्या सर्वांच्या मनातलं आपले



अमुल्य मत रीक्षा समोरील बटन दाबून आम्ही पेणकर विकास आघाडीतून उमेदवारी करणाऱ्या प्रामाणिक प्रवीण पाटील यांस भरघोस मतांनी विजयी करा. सर्वांचा या प्रभाग क्रं 2मधील मतदारांचा व नागरिकांचा एकच विचार व निर्धार प्रवीण पाटील यांना पेण शहराचा सर्वांगीण विकास व या 2 नं प्रभाग मधील रखडलेली कामे पूर्णत्सवात करण्यास प्रवीण पाटील यांचा दृढ विचार करा व निवडून आणा आपले एक एक मत मौल्यवान आहे ते रीक्षा चिन्ह निशाणीवर शिक्कामोर्तब करा म्हणजेच रीक्षा समोरील बटण दाबून प्रवीण पाटील यांना विजयी करा आशीर्वाद पण असावा.

## नगरपरिषद व नगरपंचायींच्या निवडणुकांसाठी 1 डिसेंबरला रात्री 10 पर्यंत प्रचाराची मुदत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी 2 डिसेंबर 2025 रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत ‘महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965’ मधील तरतुदीनुसार 1 डिसेंबर 2025 रोजी रात्री 10 पर्यंत असेल. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधित कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे 1 डिसेंबर 2025 रोजी रात्री 10 वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होईल. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा (Loudspeaker) वापर करता येणार नाही. त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.